रक्षणाचे वचन,
प्रेमाचे बंधन
घेऊन आला हा श्रावण
रक्षाबंधनाच्या
लाख लाख शुभेच्छा!



दैनिक
अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक ३१४ । शुक्रवार २८ ऑगस्ट २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com

## कुणबी प्रमाणपत्र पडताळणीत सुसूत्रता आणा : विखे पाटील



**संभाजीनगर :** कुणबी जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्राची प्रक्रिया सुलभ, पारदर्शक आणि गतिमान करण्याच्या सूचना जलसंपदा मंत्री तथा मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या. विद्यार्थ्यांच्या प्रकरणांना प्राधान्य देण्याचे निर्देशही त्यांनी दिले. उपलब्ध महसुली, शैक्षणिक व जुन्या अभिलेखांच्या आधारे वंशावळ आणि पुराव्यांची सुसंगती तपासावी. मोडी लिपीतील नोंदींचे तज्ज्ञांकडून भाषांतर करून घ्यावे. इतर जिल्हे व शेजारील गावांतील अभिलेखांचा संदर्भ घेऊन नातेसंबंधांची खातरजमा करावी. नागरिकांकडून आवश्यक तीच कागदपत्रे मागवावीत. ऑनलाइन प्रक्रिया प्रभावीपणे राबवून विद्यार्थ्यांसाठी विशेष शिबिरे आयोजित करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

# नेपाळमध्ये महाप्रलय

# ३५९ बळी

## ३० हून अधिक देशांचे सुमारे १,५०० नागरिक बेपत्ता

### भारताचे २८८, महाराष्ट्रातील ८० नागरिक अडकले

नेपाळमधील महाप्रलयात भारताचे २८८ नागरिक अडकल्याची माहिती समोर आली आहे. त्यापैकी महाराष्ट्रातील ८० नागरिक नेपाळमध्ये अडकले आहेत. त्यांच्या मदतीसाठी महाराष्ट्र सरकारने हेल्पलाइन सुरू केली असून, अडकलेल्या नागरिकांशी संपर्क साधून त्यांना सुरक्षित बाहेर काढण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** तिबेटमध्ये हिमनदी फुटल्यानंतर चीन-नेपाळ सीमाभागात आलेल्या महापुराने नेपाळमध्ये अभूतपूर्व विध्वंस केला आहे. पुराचे पाणी, ढिगारे आणि प्रचंड वेगाने वाहणाऱ्या प्रवाहामुळे आतापर्यंत ३५९ हून अधिक जणांचा मृत्यू, तर १,५०० हून अधिक नागरिक बेपत्ता असल्याची माहिती समोर आली आहे. या महाप्रलयाचा फटका केवळ नेपाळमधील नागरिकांनाच नव्हे, तर जगभरातून पर्यटनासाठी आलेल्या नागरिकांनाही बसला आहे.

नेपाळ पर्यटन मंडळाच्या माहितीनुसार, ५१७ विदेशी पर्यटक बेपत्ता आहेत. अमेरिका, मलेशिया, युक्रेन, ऑस्ट्रेलिया, ब्रिटन, कॅनडा यांसह ३० हून अधिक देशांतील नागरिकांचा संपर्क तुटला आहे. अमेरिकेचे ६५, मलेशियाचे ५१, युक्रेनचे ५३, ऑस्ट्रेलियाचे ३५, ब्रिटनचे ३३ आणि कॅनडाचे २५ नागरिक बेपत्ता असल्याची माहिती देण्यात आली आहे.

सिंगापूरचे ८, जर्मनीचे ८, रशियाचे ८, दक्षिण आफ्रिकेचे ६, लाटव्हियाचे ६ आणि जपानचे ५ नागरिकही बेपत्ता आहेत. चीनच्या गीरोंग काउंटीमध्येही मोठ्या प्रमाणावर नागरिक बेपत्ता असून, चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाने नेपाळकडून सुमारे १०० चिनी नागरिक बेपत्ता असल्याची माहिती मिळाल्याचे म्हटले आहे.नेपाळमधील विविध जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर मृतदेह आढळले आहेत. रसुवामध्ये १७, नुवाकोटमध्ये २८, धाडिंगमध्ये ३३, चितवनमध्ये १३२, गोरखामध्ये ३०, तनहुनमध्ये २२, नवलपरासी पूर्वमध्ये ८२ आणि नवलपरासी पश्चिममध्ये १५ मृतदेह सापडल्याची माहिती आहे.

दरम्यान, खराब हवामान, दुर्गम डोंगराळ भाग, ढिगारे आणि पुराच्या जोरदार प्रवाहामुळे बचावकार्याला मोठ्या अडचणी येत आहेत. नेपाळ आणि चीनच्या यंत्रणांकडून युद्धपातळीवर शोध व बचावमोहीम सुरू असून, बेपत्ता नागरिकांचा शोध घेण्याचे काम सुरू आहे.

# ऋषिकेश शेटे यांच्या वाहनावर दगडफेक

## नेवासा शहरात तणावपूर्ण शांतता



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** नेवासा शहरात गुरुवारी (दि. २७) दुपारी हिंदुत्ववादी नेते ऋषिकेश शेटे यांच्या वाहनावर जमावाने दगडफेक केल्याची घटना घडली. खोलेश्वर गणपती मंदिर चौकाजवळ घडलेल्या या घटनेत वाहनाचे मोठे नुकसान झाले असून शेटे किरकोळ जखमी झाल्याची माहिती आहे. पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करून जमावाला पांगविल्याने परिस्थिती नियंत्रणात आली.

संत ज्ञानेश्वर महाराज मंदिराकडे जाणारा रस्ता भाविकांसाठी खुला करावा, या मागणीसाठी शेटे यांनी गुरुवारी दुपारी नेवासा नगरपंचायतीला निवेदन दिले होते. त्यानंतर नगरपंचायत प्रशासनाने सार्वजनिक बांधकाम विभाग व पोलिसांना पत्र देऊन रस्त्याच्या मध्यभागी असलेल्या अतिक्रमणाबाबत कार्यवाही करण्याची प्रक्रिया सुरू केली होती. (पान ४ वर)

### शांतता राखण्याचे आवाहन

नेवासा शहरातील परिस्थिती नियंत्रणात आहे. नागरिकांनी शांतता व संयम राखावा. कोणीही कायदा हातात घेऊ नये; अन्यथा संबंधितांविरोधात कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असे पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी सांगितले.

# शाळा सुटली अन् भरधाव कारने सहा चिमुकल्यांना उडवले!

## शिक्षकाच्या कारची विद्यार्थ्यांना धडक; दोघांची प्रकृती गंभीर, प्रवरा रुग्णालयात उपचार सुरू

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** शाळा सुटली... हातात दप्तर घेत चिमुकले विद्यार्थी घराच्या दिशेने निघाले... काही क्षणांतच भरधाव कारने त्यांना जोरदार धडक दिली आणि आनंदाने घराकडे निघालेल्या विद्यार्थ्यांच्या वाटेवर काळाने घाला घातला. श्रीरामपूर तालुक्यातील ब्राह्मणगाव वेताळ–शिरसगाव मार्गावर गुरुवारी झालेल्या या हृदयद्रावक अपघातात सहा विद्यार्थी जखमी झाले. त्यापैकी दोघांची प्रकृती गंभीर असून, त्यांच्यावर लोणी येथील प्रवरा वैद्यकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

या अपघातातील जखमी विद्यार्थी वैभव अमोल बर्डे, प्रीती अमोल बर्डे, आकांक्षा आकाश बर्डे, केशव आकाश बर्डे, पूजा आकाश बर्डे आणि श्रद्धा बाळासाहेब तोरणे अशी नावे आहेत. सर्व विद्यार्थी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, ब्राह्मणगाव वेताळ येथे शिक्षण घेत आहेत. सध्या सर्व विद्यार्थ्यांची प्रकृती स्थिर असल्याचे वैद्यकीय सूत्रांनी सांगितले असले तरी दोन विद्यार्थ्यांची प्रकृती गंभीर असल्याने पालकांची चिंता वाढली आहे. (पान ४ वर)

### शाळांच्या परिसरात सुरक्षितता कधी?

या दुर्घटनेने पुन्हा एकदा शाळा परिसरातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न ऐरणीवर आणला आहे. शाळांजवळ वाहनांच्या वेगावर नियंत्रण, स्पष्ट वेगमर्यादा, वाहतूक नियंत्रण व्यवस्था आणि विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित रस्ते उपलब्ध करून देण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

## शेवगाव दंगल प्रकरणाचा ‘ऑडिओ बॉम्ब’

### प्रा. किसन चव्हाण यांना मुख्य आरोपी केल्याचा उल्लेख असल्याचा दावा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** शेवगाव शहरातील छत्रपती संभाजी महाराज जयंती मिरवणुकीदरम्यान १४ मे २०२३ रोजी झालेल्या दंगलप्रकरणाला आता कथित ऑडिओ क्लिपमुळे नवे वळण मिळाले आहे.



तत्कालीन शेवगाव पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांचे संभाषण असल्याचा दावा करण्यात आलेल्या या ऑडिओ रेकॉर्डिंगमध्ये वंचित बहुजन आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष प्रा. किसन चव्हाण यांना दंगलप्रकरणात मुख्य आरोपी केल्याचा उल्लेख असल्याचे सांगण्यात येत आहे. संबंधित ऑडिओ क्लिप आणि पत्रकाराचे प्रतिज्ञापत्र चौकशी अधिकाऱ्यांकडे सादर करण्यात आल्याची माहिती प्रा. चव्हाण यांनी गुरुवारी दिली.

अहिल्यानगर येथील शासकीय विश्राम गृहात माध्यमांशी बोलताना प्रा. चव्हाण यांनी हा दावा केला. ‘दंगलीच्या वेळी आपण शेवगावमध्ये उपस्थितच नव्हतो, तरीही आपल्याला जाणीवपूर्वक आरोपी करण्यात आले,’ असा आरोप त्यांनी केला. १४ मे रोजी पूर्वनियोजित कार्यक्रमासाठी छत्रपती संभाजीनगर येथे गेलो होतो आणि रात्री उशिरा शेवगावला पोहोचेपर्यंत दंगल शांत झाली होती, असे त्यांनी सांगितले. ‘मुख्य आरोपी केले’ असा उल्लेख (पान ४ वर)

# कुख्यात शिंदे टोळी जिल्ह्यातून एक वर्षासाठी हद्दपार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी आणि नागरिकांमध्ये सुरक्षित वातावरण निर्माण करण्यासाठी पोलीस प्रशासनाने कठोर पावले उचलली आहेत. पारनेर तालुका आणि नगर तालुका परिसरात गंभीर स्वरूपाचे शरीरा विरुद्ध व माला विरुद्ध गुन्हे करणाऱ्या कुविख्यात शिंदे टोळीवर वचक बसवण्यासाठी त्यांना जिल्ह्यातून एक वर्षासाठी हद्दपार करण्यात आले आहे.

याबाबत माहिती अशी की, सुपा पोलीस स्टेशन हद्दीत चोरी करणे , रस्त्यात अडवून मारहाण करणे, जिवे मारण्याची धमकी देणे, खुनचा प्रयत्न करणे आणि घातक शस्त्र बाळगणे यासारखे गंभीर गुन्हे करणाऱ्या या टोळी विरुद्ध सुपा पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षकांनी हद्दपारचा प्रस्ताव सादर केला होता. या प्रस्तावाची सखोल चौकशी केल्यानंतर टोळीप्रमुख अतुल विश्वनाथ शिंदे (रा. शहाजापूर, तालुका पारनेर) तसेच टोळीतील सदस्य अरुण शिवाजी गवळी आणि अनिकेत शशिकांत गवळी (दोघे रा. शहाजापूर, ता. पारनेर) यांना अहिल्यानगर जिल्ह्यातून एक वर्षासाठी हद्दपार करण्याचे आदेश पारित करण्यात आले आहेत.

या टोळी विरुद्ध विविध पोलीस ठाण्यात अनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत. आगामी काळात जिल्ह्यात संघटित गुन्हेगारी रोखण्यासाठी शरीराविरुद्ध, मालाविरुद्ध, गोवंशीय कायदा, भारतीय हत्यार कायदा तसेच वाळू चोरीचे गुन्हे करणाऱ्या इतर गुन्हेगारांची माहिती संकलित करून त्यांच्यावरही कठोर हद्दपारची कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलीस प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

# साधूच्या वेशातील भामटे २४ तासांत जेरबंद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कारसह चौघांना अटक**



**शिर्डी :** राहाता शहरात साधूच्या वेशात येऊन चोरी केल्याप्रकरणी राहाता पोलिसांनी अवघ्या २४ तासांत कारवाई करत चौघांना जेरबंद केले. विशेष म्हणजे, गुन्ह्यानंतरही हे आरोपी साधूच्या वेशात राहाता–कोपरगाव परिसरात बिनधास्तपणे फिरत होते. मात्र, पोलिसांनी मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पाळत ठेवून त्यांना ताब्यात घेतले. राहाता शहरात चोरीची घटना घडल्यानंतर पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने (पान ४ वर)

श्रावण तिसरा शुक्रवारनिमित्त मढी येथे
कानिफनाथांच्या पालखी सोहळ्यासाठी
येणाऱ्या भाविकांचे सहर्ष स्वागत









श्री. राजेश भाऊसाहेब जायगुडे
अध्यक्ष -ओम चैतन्य कानिफनाथ सेवा मंडळ भांगरवाडी लोणावळा

मा.आमदार सुनिल (आण्णा) शेळके
मावळ तालुका

ओम चैतन्य कानिफनाथ सेवा मंडळ भांगरवाडी लोणावळा

# लोकसभा निवडणूक आज झाली तर

# महाराष्ट्रात उलटफेर?

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** २०२४च्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्राने भाजपप्रणित महायुतीला दिलेला जबरदस्त धक्का आता उलटण्याची शक्यता आहे. आज लोकसभा निवडणूक झाली तर महाराष्ट्रात महायुतीला ३१, तर महाविकास आघाडीला अवघ्या १७ जागा मिळतील, असा अंदाज इंडिया टुडे आणि सी-व्होटरच्या सर्वेक्षणातून व्यक्त करण्यात आला आहे. त्यामुळे सव्वा दोन वर्षांपूर्वीच्या लोकसभा निकालाचे चित्र पूर्णपणे पालटण्याची शक्यता या सर्वेक्षणाने व्यक्त केली आहे.

२०२४च्या निवडणुकीत राज्यातील ४८ पैकी महायुतीला केवळ १७ जागा, तर महाविकास आघाडीला ३० जागा मिळाल्या होत्या. भाजपच्या जागांमध्ये झालेली मोठी घट राष्ट्रीय पातळीवरही भाजपसाठी धक्का ठरली होती. भाजपला स्वबळावर बहुमत मिळवता आले नाही आणि केंद्रात एनडीएचे सरकार स्थापन झाले. २०२४मध्ये भाजपला महाराष्ट्रातून केवळ ९ जागा मिळाल्या. शिवसेना शिंदे गटाला ७ आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला १ जागा मिळाल्याने महायुतीचा आकडा १७ वर थांबला. दुसरीकडे काँग्रेसला १३, शिवसेना ठाकरे गटाला ९ आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाला ८ जागा मिळाल्याने मविआने ३० जागांचा टप्पा गाठला. एका अपक्ष खासदाराच्या (पान ४ वर)

**महायुतीला ३१, मविआला १७ जागांचा अंदाज; २०२४च्या निकालाचे चित्र बदलण्याची शक्यता**




**देशातही एनडीएची आघाडी...** राष्ट्रीय पातळीवरही एनडीएला पुन्हा एकदा सत्ता मिळण्याचा अंदाज या सर्वेक्षणातून व्यक्त झाला आहे. आज लोकसभा निवडणूक झाल्यास एनडीएला ३२६, तर इंडिया आघाडीला १८५ जागा मिळण्याचा अंदाज आहे. २०२४मध्ये एनडीएला २९३, तर इंडिया आघाडीला २३४ जागा मिळाल्या होत्या. म्हणजेच एनडीएच्या जागांमध्ये वाढ, तर इंडिया आघाडीच्या जागांमध्ये घट होण्याचा अंदाज आहे.

प्रेरणास्थान



कै.अशोक मुखेकर (सर)

श्रावण तिसरा शुक्रवारनिमित्त मढी येथे
कानिफनाथांच्या पालखी सोहळ्यासाठी
येणाऱ्या भाविकांचे सहर्ष स्वागत







डॉ.धनंजय मुखेकर
अध्यक्ष, भैरवनाथ शिक्षण क्रीडा व समाजसेवा मंडळ, अ.नगर

श्री.बाळासाहेब मरकड
समन्वयक, शिवतेज विद्यालय, मढी

शिवतेज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, मढी
ता.पाथर्डी, जि.अ.नगर

# पत्रकाराला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याचा हा प्रयत्न कुणासाठी?

**विशेष संपादकीय — करण नवले (संपादक)**

पुण्यातील सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाच्या वसतिगृह परिसरात राहुल गांधी यांच्या 'छात्रों की गूंज' कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर घडलेल्या घटनांनी विद्यार्थी राजकारण, राजकीय हस्तक्षेप आणि पत्रकारितेच्या स्वातंत्र्याबाबत अनेक गंभीर प्रश्न उभे केले आहेत. एबीव्हीपी आणि एनएसयूआयच्या कार्यकर्त्यांमधील संघर्ष, विद्यार्थिनीच्या व्हिडिओवरून निर्माण झालेला वाद, त्यानंतर दोन्ही बाजूंनी करण्यात आलेले आरोप आणि आता सीओईपी प्रशासनाने दाखल केलेला गुन्हा, या संपूर्ण घटनाक्रमाकडे केवळ राजकीय चष्म्यातून पाहणे धोकादायक आहे. कारण या सगळ्या गदारोळात आणखी एक गंभीर प्रश्न समोर आला आहे की, सत्य परिस्थिती समाजासमोर आणणाऱ्या पत्रकारालाच आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याचा प्रयत्न तर होत नाही ना?

उपलब्ध एफआयआरनुसार, शिवाजीनगर पोलीस ठाण्यात २३ ऑगस्ट २०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. तक्रारदार सीओईपीच्या वसतिगृह विभागाचे मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ. राजू तुकाराम पाचकोर आहेत. तक्रारीत १९ ऑगस्टला विद्यार्थिनी संपदा प्रमोद बडे हिच्याबाबत तयार करण्यात आलेल्या व्हिडिओचा उल्लेख आहे. तसेच २१ ऑगस्टच्या संध्याकाळी ७.४५ ते ९.४५ या वेळेत सीओईपी वसतिगृह परिसरात परवानगीशिवाय १०० ते १५० एनएसयूआय व काँग्रेस कार्यकर्ते जमले, घोषणाबाजी झाली आणि सुरक्षा व्यवस्थेबाबत गोंधळ निर्माण झाला, असा आरोप करण्यात आला आहे. यासाठी भारतीय न्याय संहितेतील विविध कलमे आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियमातील कलमे लावण्यात आली आहेत.

कायद्याचे उल्लंघन झाले असेल तर तपास झाला पाहिजे. दोषी आढळल्यास कारवाईही झाली पाहिजे. पण प्रश्न एवढाच आहे की या संपूर्ण प्रकरणाचे वार्तांकन करणाऱ्या पत्रकाराला त्याच राजकीय संघर्षाच्या चौकटीत का ओढले जात आहे?

मंदार गोंजारी हे एबीपी माझाचे पत्रकार आहेत. त्यांचे नाव उपलब्ध एफआयआरमध्ये आरोपी म्हणून नाही. मात्र तक्रारीत 'एबीपी माझाचा पत्रकार' असा उल्लेख आहे. त्यामुळे पत्रकारितेच्या स्वातंत्र्याच्या दृष्टीने हा उल्लेख अत्यंत महत्त्वाचा ठरतो. मंदार गोंजारी हे दीर्घकाळ पत्रकारितेत काम करणारे आणि रामनाथ गोएंका पुरस्काराने सन्मानित पत्रकार आहेत. त्यांनी घटनास्थळी जाऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला, त्यांची बाजू जाणून घेतली आणि जे दिसले ते समाजासमोर आणण्याचा प्रयत्न केला. त्यांचे वार्तांकन कुणाला आवडले नाही म्हणून त्यामागे सूडबुद्धी शोधली जात असेल, तर हा प्रश्न केवळ एका पत्रकाराचा राहत नाही; तो संपूर्ण माध्यमविश्वाच्या स्वातंत्र्याचा प्रश्न बनतो.

राहुल गांधी यांच्या पुणे दौऱ्याच्या आधी सीओईपी परिसरात एबीव्हीपी आणि एनएसयूआयमध्ये तणाव निर्माण झाला. एका विद्यार्थिनीच्या व्हिडिओनंतर आरोप-प्रत्यारोप सुरू झाले. विद्यार्थिनीने नंतर स्वतःला राजकीय वादात ओढू नये, अशी भूमिका घेतल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले. एबीव्हीपीने विद्यार्थ्यांवर कार्यक्रमाला उपस्थित राहण्यासाठी दबाव आणल्याचा आरोप केला, तर काँग्रेस-एनएसयूआयकडून विद्यार्थिनींवर दबाव आणि धमकावल्याचे आरोप करण्यात आले. त्यानंतर झालेल्या संघर्षात मोठ्या संख्येने एनएसयूआय आणि युवक काँग्रेस कार्यकर्त्यांवर गुन्हा दाखल झाल्याचेही वृत्त आहे.

म्हणजेच घटना एकतर्फी नव्हती. वातावरण आधीच राजकीयदृष्ट्या तापलेले होते. अशा वेळी पत्रकार घटनास्थळी गेला नाही तर 'घाबरला', 'पत्रकार असूनही घटनास्थळी गेला नाही' अशी टीका होते. आणि तो गेला, विद्यार्थ्यांशी बोलला, प्रत्यक्ष परिस्थितीचे वार्तांकन केले तर 'एकांगी वार्तांकन', 'राजकीय भूमिका' अशी शिक्केबाजी सुरू होते. मग पत्रकाराने करायचे तरी काय?

पत्रकाराचे काम कोणाला खूश करणे नाही. पत्रकाराचे काम घटनास्थळी जाणे, संबंधितांच्या प्रतिक्रिया घेणे, उपलब्ध तथ्य तपासणे आणि समाजासमोर प्रश्न ठेवणे हे आहे. पत्रकाराच्या प्रत्येक बातमीशी सर्व पक्ष सहमत असतील, अशी अपेक्षा ठेवणे म्हणजे पत्रकारितेचे मूलभूत स्वरूपच नाकारणे होय.

सीओईपी प्रशासनाच्या तक्रारीतील आणखी एक मुद्दा तपासण्यासारखा आहे. तक्रारीतच कुलगुरूंशी बैठक झाल्यानंतर काही मागण्या मान्य झाल्याचा उल्लेख आहे. मग ज्या मागण्यांवर विद्यार्थ्यांमध्ये चर्चा सुरू होती, त्याच मागण्यांबाबत पत्रकाराने वार्तांकन केले असेल तर त्याला 'गोंधळ निर्माण करणारा' किंवा 'बदनामी करणारा' ठरवण्याची घाई का? प्रशासनाला बातमी चुकीची वाटत असेल तर त्याचे खंडन करणे, अधिकृत कागदपत्रे देणे, पत्रकाराला आपली बाजू सांगणे हा लोकशाही मार्ग आहे; थेट गुन्हे दाखल करण्याची भाषा हा शेवटचा उपाय असला पाहिजे.

आणखी एक प्रश्न अधिक बोचरा आहे. जर विनापरवानगी प्रवेश, घोषणाबाजी, गोंधळ किंवा हाणामारी हा गुन्हा असेल तर त्या संपूर्ण घटनाक्रमात सहभागी असलेल्या प्रत्येकाची भूमिका तपासली जावी. कायदा पक्ष पाहून लागू होत नाही. एका बाजूचे कार्यकर्ते आरोपी आणि दुसऱ्या बाजूचे कार्यकर्ते केवळ 'बळी', अशी आधीच भूमिका ठरवून तपास सुरू झाला तर न्याय कुठे उरेल?

पत्रकारांनीही आत्मपरीक्षण करायला हवे. संवेदनशील घटनांचे वार्तांकन करताना संयम, तथ्य, पडताळणी आणि संतुलन अत्यावश्यक आहे. समाजातील राजकीय आणि सामाजिक विषमता शिगेला पोहोचलेली असताना शब्दांची जबाबदारी अधिक वाढते. परंतु पत्रकाराने शक्य तितके संतुलन राखले म्हणूनही सर्वजण त्याच्यावर खूश राहतीलच असे नाही. पत्रकारितेचा मार्ग टाळ्यांचा नसतो; तो प्रश्नांचा असतो.

मंदार गोंजारी हे आमचे मित्र आणि जुने सहकारी आहेत. मूल्याधारित पत्रकारिता करण्याचा त्यांचा प्रयत्न आम्ही जवळून पाहिला आहे. म्हणूनच त्यांच्यावरील कारवाईचा निषेध करणे ही व्यक्तीपूजा नाही; हा पत्रकारितेच्या स्वातंत्र्याचा प्रश्न आहे.

सीओईपीसारख्या प्रतिष्ठित संस्थेने दाखल केलेली फिर्याद कायद्याच्या कसोटीवर टिकते की नाही, हे तपास आणि न्यायालय ठरवतील. वस्तुस्थिती तक्रारीत नसेल तर तपासाच्या प्रक्रियेत प्रशासनाची बाजूच उघडी पडेल. पण पत्रकाराला राजकीय संघर्षात ओढून त्याच्यावर दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न झाला असेल, तर तो प्रकार लोकशाहीसाठी अधिक धोकादायक आहे.

सत्तेला प्रश्न विचारणारा पत्रकार आवडत नाही, म्हणून त्याला घाबरवणे हा मार्ग लोकशाहीचा नाही. संस्थाचालक असोत, सत्ताधारी असोत किंवा त्यांचे राजकीय हस्तक, पत्रकारावर सूड उगवण्याचा खुजेपणा कुणालाही शोभत नाही.

आज प्रश्न मंदार गोंजारींचा आहे. उद्या तो कुणाचाही असू शकतो. म्हणूनच या प्रकरणात पत्रकाराला गप्प करण्याऐवजी, घटनेची निष्पक्ष चौकशी करा, सर्व बाजू तपासा आणि सत्य बाहेर येऊ द्या. कारण लोकशाहीत पत्रकाराला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्यापेक्षा सत्तेला आरशासमोर उभे करण्याची ताकद अधिक महत्त्वाची असते. मंदार गोंजारी यांच्या पाठीशी उभे राहणे म्हणजे एका पत्रकाराच्या पाठीशी उभे राहणे नव्हे; ते निर्भय पत्रकारितेच्या पाठीशी उभे राहणे आहे.

## शनिदेव ही विश्वाची न्यायदेवता : अनुराधा पौडवाल

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**





**सोनई:** प्रसिद्ध पार्श्वगायिका अनुराधा पौडवाल यांनी रक्षाबंधनाच्या पूर्वसंध्येला शनिशिंगणापूर येथे येऊन शनिदेवाचे दर्शन घेतले. उदासी महाराज मठात पुरोहितांच्या हस्ते त्यांनी शनिदेवाला तैलाभिषेक केला. त्यानंतर शनी चौथऱ्याखालून देवाचे औक्षण करून शनिदेवाला राखी आणि पाच ग्रॅम सोन्याची साखळी अर्पण केली. यावेळी त्यांच्या समवेत ॲड. आश्लेषा गोवारीकर उपस्थित होत्या.

**'शनिशिंगणापूर माझे माहेर' शनिशिंगणापूर हे माझे माहेर असून शनिदेवाने आणि स्व. बाबुराव बानकर यांनी मला लेक मानले आहे. त्यामुळे दरवर्षी रक्षाबंधनानिमित्त मला येथे माहेरची साडी भेट दिली जाते, असे अनुराधा पौडवाल यांनी सांगितले.**

अनुराधा पौडवाल यांनी १९९२ मध्ये शनिदेवाची मराठी भजने असलेली ध्वनिफीत, तर १९९५ मध्ये शनिदेवाच्या लीलांवर आधारित 'सूर्यपुत्र शनिदेव' हा चित्रपट निर्माण केला होता. त्यानंतर शनिशिंगणापूर तीर्थक्षेत्राची प्रसिद्धी वाढून भाविकांचा ओघही वाढला.

दर्शनानंतर देवस्थानच्या जनसंपर्क कार्यालयात राज्य पोलीस पाटील संघटनेचे राज्य सदस्य तथा शनिशिंगणापूरचे पोलीस पाटील ॲड. सयाराम बानकर आणि कार्यालयीन अधीक्षक लक्ष्मण वाघ यांनी शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार केला.

यावेळी पौडवाल म्हणाल्या, शनिदेव ही विश्वाची न्यायदेवता असून चांगले कर्म करणाऱ्यांना चांगले फळ, तर वाईट कर्म करणाऱ्यांना शिक्षा मिळते. माझी मनोकामना पूर्ण झाल्याने मी दरवर्षी शनिदेवाला आणि स्व. बाबुराव बानकर यांना राखी बांधण्यासाठी येथे येते. स्व. बानकर भाऊ माझ्यासाठी आदर्श व्यक्तिमत्त्व होते.

## राहुरी रेल्वे स्थानकावर प्रमुख गाड्यांना थांबा द्या : आ. अक्षय कर्डिले

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी:** राहुरी रेल्वे स्थानकावर प्रमुख रेल्वे गाड्यांना थांबा देण्यासह बंद असलेल्या पॅसेंजर गाड्यांच्या सेवा पुन्हा सुरू कराव्यात, अशी मागणी राहुरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार अक्षय शिवाजीराव कर्डिले यांनी मध्य रेल्वेच्या पुणे विभागीय रेल्वे व्यवस्थापकांकडे केली आहे.

आ. कर्डिले यांनी रेल्वे प्रशासनाला दिलेल्या पत्रात पुणे-जम्मू तवी झेलम एक्सप्रेस, महाराष्ट्र एक्सप्रेस तसेच पुणे-अमरावती एक्सप्रेस या महत्त्वाच्या गाड्यांना राहुरी स्थानकावर थांबा देण्याची मागणी केली आहे. तसेच पुणे-नांदेड, पुणे-मनमाड आणि शिर्डी-पंढरपूर पॅसेंजर रेल्वे सेवा पूर्ववत करण्याची मागणीही त्यांनी केली.

स्थानकावर वाशांसाठी तिकीट आरक्षणाची सुविधा सुरू करावी तसेच पादचारी उड्डाणपूल उभारावा, अशी मागणीही करण्यात आली आहे. आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध झाल्यास प्रवाशांची गैरसोय दूर होऊन रेल्वे प्रवासाला चालना मिळेल, असे आ. कर्डिले यांनी नमूद केले.

राहुरीजवळ शिर्डी, शनि शिंगणापूर, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, मुळा धरण तसेच विविध साखर कारखाने आहेत. त्यामुळे विद्यार्थी, शेतकरी, व्यापारी आणि पर्यटकांची मोठी ये-जा असते. प्रमुख गाड्यांना थांबा नसल्याने प्रवाशांना अन्य स्थानकांवर जावे लागते. त्यामुळे वेळ व आर्थिक खर्च वाढत असून राहुरीला प्रमुख गाड्यांचे थांबे मिळणे आवश्यक असल्याचे आ. कर्डिले यांनी म्हटले आहे.

## नेवासे येथे उद्यापासून ज्ञानेश्वरी पारायण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**नेवासा :** श्रावण मासानिमित्त श्री ज्ञानेश्वरी व अमृतानुभव ग्रंथाच्या रचनास्थान असलेल्या श्रीक्षेत्र नेवासा येथे श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार, दि. २९ ऑगस्ट ते शनिवार, दि. ५ सप्टेंबर दरम्यान संत ज्ञानेश्वर महाराज पैस खांब मंदिरात हा सोहळा होणार असून, त्याची तयारी सुरू झाली आहे.

वै. गु. ह.भ.प. बन्सी महाराज तांबे यांच्या प्रेरणेतून सुरू झालेल्या या ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याला यंदा ६९ वर्षे पूर्ण होत आहेत. सोहळ्याचे नेतृत्व संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे प्रमुख मार्गदर्शक ह.भ.प. वेदांताचार्य देविदास महाराज म्हस्के शास्त्री करणार आहेत.

दररोज पहाटे ४ ते ६ काकडा भजन व आरती, सकाळी ७ ते ११ सामुदायिक ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी ४ ते ५ प्रवचन, सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ, सायंकाळी ७ ते ९ हरिकीर्तन आणि रात्री १० ते पहाटे ४ हरिजागर असे कार्यक्रम होणार आहेत.

या सप्ताहात नवनाथ महाराज आगळे, गहिनीनाथ महाराज आढाव, कृष्णा महाराज हारदे, राम महाराज खरवंडीकर, श्रीहरी महाराज वाकचौरे, स्वामी भारतानंदगिरीजी महाराज आणि महंत रामभाऊ महाराज राऊत यांची प्रवचने होणार आहेत. विविध संत-महंतांच्या कीर्तनांचेही आयोजन करण्यात आले आहे. दि. ५ सप्टेंबर रोजी सकाळी काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता होईल.

माऊली भक्तांनी ज्ञानेश्वरी पारायण, प्रवचन व कीर्तनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानच्या अध्यक्ष व विश्वस्त मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

## अश्विनाथ महाराज परिसर विकासा साठी निधीची कमतरता भासू देणार नाही : आ. खताळ

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**संगमनेर :** पारेगाव खुर्द आणि निमोण या दोन्ही गावांच्या सरहद्दीवरील सर्वधर्मीयांच्या श्रद्धेचे, आस्थेचे आणि सामाजिक ऐक्याचे प्रतीक असलेल्या अश्विनाथ महाराज देवस्थान परिसराच्या विकासासाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही, असा विश्वास आमदार अमोल खताळ यांनी व्यक्त केला.

तालुक्यातील निमोण परिसरात आ. अमोल खताळ यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. त्यांनी अश्विनाथ महाराजांच्या पालखीचे दर्शन घेतले. तसेच पारेगाव बुद्रुक येथे महाराजांच्या मानाच्या काठीची विधिवत पूजा केली. यानंतर अश्विनाथ महाराजांच्या गडावर जाऊन भगवी चादर अर्पण करून दर्शन घेत आशीर्वाद घेतला. गणपती व अश्विनाथ महाराजांची महाआरती ही त्यांच्या हस्ते करण्यात आली. यात्रोत्सवानिमित्त परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. भाविक, ग्रामस्थ तसेच विविध धर्मीय नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.आ. खताळ म्हणाले, तुमच्या सर्वांच्या सहकार्याने या परिसराचा विकास केला जाईल. परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी आपण कटिबद्ध आहोत. गावांमध्ये छोटे-मोठे प्रश्न असतात. हे प्रश्न कोणताही वाद न वाढविता एकत्रित येऊन सामंजस्याने आणि सर्वांच्या सहकार्याने सोडविले पाहिजेत. यासाठी प्रशासनाचीही मोलाची साथ मिळत आहे. नागरिक, ग्रामस्थ आणि प्रशासन यांच्या समन्वयातून या परिसराचा विकास अधिक वेगाने करता येईल. असा विश्वास आमदार खताळ यांनी दिला .

## रस्त्यात अडथळा ठरलेला टॉवर त्वरित हटवा, भारतीय लहुजी सेनेची मागणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** तालुक्यातील सौंदाळा येथील शेतकरी शिवाजी रामभाऊ आरगडे यांच्या शेतीमध्ये गट नं. १२०/१ मध्ये जाण्यायेण्याच्या रस्त्यामध्ये असलेल्या पारेशन विद्युत कंपनीचा टॉवर हटवून रस्ता तात्काळ खुला करण्यात यावा अन्यथा दि. १ सप्टेंबरपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा भारतीय लहुजी सेनेचे प्रदेशाध्यक्ष सुरेश आढागळे यांनी जिल्हाधिकारी व नेवासा तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात दिला आहे.

सौंदाळा ता. नेवासा येथील शेतकरी शिवाजी रामभाऊ आरगडे गट नं. १२०/१ मध्ये जाण्यायेण्याच्या रस्त्यात पारेशन विद्युत कंपनीने उभारलेला टॉवर हटवण्यासाठी अनेक वेळ तोंडी व लेखी अर्ज देऊन देखील त्या संबधीत अधिकारी व पारेशन कंपनीने कोणतीही दखल घेतली नसल्याने आम्ही भारतीय लहुजी सेना या सामाजिक संघटनेच्या वतीने शेतकरी शिवाजी रामभाऊ आरगडे यांच्या वतीने आमरण उपोषणासाठी बसत असल्याचे निवेदनात स्पष्ट केले आहे. याबाबत कार्यवाही न झाल्यास दि. १ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशारा निवेदनात देण्यात आला आहे.



## बेलपिंपळगावच्या विकास कामाबद्दल आ. विठ्ठलराव लंघे यांचा सत्कार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान :** नेवासा तालुक्यातील राजकीयदृष्ट्या महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या बेलपिंपळगाव येथील विविध विकास कामांना निधी मंजूर करून दिल्याबद्दल नेवासा मतदार संघाचे आ. विठ्ठलराव लंघे यांचा बेलपिंपळगाव ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला. बेल पिंपळगाव फाटा ते बेलपिंपळगाव या ३ किलोमीटर रस्त्यासाठी २ कोटी रुपये, तीर्थक्षेत्र विकास अंतर्गत बेलपिंपळगाव गावातील हनुमान मंदिर सुशोभीकरणासाठी २५ लक्ष रुपये, जिल्हा परिषद शाळेसाठी दोन वर्ग खोल्या साठी २४ लक्ष रुपये, लोखंडे फॉल ते बेल पिंपळगाव रस्त्याचे मजबुतीकरण आदी विकास कामासाठी निधी मंजूर केल्याबद्दल तसेच बेलपिंपळगाव भागातील बंधारे, पाझर तलाव, व शेतीसाठी आवर्तनाबाबत अहिल्यानगर पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता स्वप्निल काळे यांच्याशी दूरध्वनीद्वरे संपर्क साधून पाण्याचे नियोजन संदर्भात सूचना केल्या त्याबद्दल आ. विठ्ठलराव लंघे यांचा बेलपिंपळगाव येथील ग्रामस्थांच्यावतीने सत्कार करण्यात आला व विविध विकास कामांबद्दल निधी दिल्याबद्दल आभार व्यक्त करण्यात आले.

सत्कार प्रसंगी शेतकरी संघटना प्रभारी व प्रवक्ते प्रा. कार्लस साठे, वसंतराव शेरकर, खंडेराव सरोदे, मुमताज सय्यद, अरविंद साळवे, पुंडलिक सरोदे, मा. चेअरमन शिवाजी चौगुले, शिवाजी कांगुणे, बाळासाहेब भद्रे, किशोर पटारे,प्रमोद भद्रे, रत्नदीप कांबळे, सुनील बर्डे, दादासाहेब शिंदे, ऋषिकेश शिंदे आदी उपस्थित होते.



## चिमुकल्यांनी पोलिस बांधवांना राखी बांधून साजरे केले रक्षाबंधन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**





**श्रीरामपूर:** भाऊ-बहिणीच्या प्रेमाचे आणि ऋणानुबंधांचे नाते अधिक घट्ट करणारा रक्षाबंधनाचा सण श्रीरामपूर येथील बेलापूर एज्युकेशन सोसायटीच्या एस.आर.के. स्कूलमध्ये आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा करण्यात आला. महिलांच्या सुरक्षेसाठी सदैव तत्पर असलेल्या पोलिस बांधवांना विद्यार्थिनींनी राखी बांधून त्यांच्या सेवेला कृतज्ञतेची मानवंदना दिली.

यावेळी बेलापूर पोलिस ठाण्याचे मनोज गोसावी, भारत तमनर, आकाश वाघमारे यांच्यासह संस्थेचे सचिव शरद सोमाणी, उपाध्यक्ष राजेश खटोड, चेअरमन रविंद्र खटोड, नवनाथ कुताळ, किशोर महापुरे, प्राचार्य दत्तात्रय पुजारी, वैशाली कुलकर्णी, मेघा गोरे, कविता वायखिंडे, अश्विनी जाधव, सोनाली ठोंबरे, समीक्षा उचित आदी उपस्थित होते.

विद्यालयातील विद्यार्थिनींनी पोलिस बांधवांना औक्षण करून त्यांच्या मनगटावर राखी बांधली. पोलिसांच्या कर्तव्यनिष्ठ सेवेमुळे समाजात सुरक्षिततेची भावना निर्माण होते, याबद्दल विद्यार्थिनींनी त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

कार्यक्रमादरम्यान मान्यवरांनी रक्षाबंधनाच्या सणाचे महत्त्व सांगत विद्यार्थ्यांना प्रेम, बंधुत्व आणि परस्पर आदराची भावना जपण्याचे आवाहन केले. पोलिस आणि विद्यार्थिनी यांच्यातील या स्नेहपूर्ण उपक्रमामुळे शाळेच्या परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

## प्रवरेच्या संस्कारातून विद्यार्थ्यांनी जीवनातील शिखरे जिंकावीत : विश्वास पाटील

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**लोणी:** शिक्षणातून संवेदना, प्रेरणा आणि सामाजिक बांधिलकी निर्माण करणारा प्रवरा परिसर विद्यार्थ्यांना जीवन घडविणारे संस्कार देत आहे. जीवनाच्या वाटचालीत अनेक चढ-उतार येतील; मात्र प्रत्येक आव्हानावर मात करून जीवनातील प्रत्येक शिखर जिंकण्याची जिद्द विद्यार्थ्यांनी ठेवावी, असे प्रतिपादन ९९ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ साहित्यिक विश्वास पाटील यांनी केले.पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांच्या १२६ व्या जयंतीनिमित्त प्रवरा औद्योगिक, शैक्षणिक व सांस्कृतिक समूहाच्या वतीने लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेतील गुणवंत तसेच क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील होते. विश्वास पाटील म्हणाले, प्रवरेचे नाव शिक्षण क्षेत्रात देशभर अभिमानाने घेतले जाते. येथील शिक्षणपद्धती, वातावरण आणि संस्कार विद्यार्थ्यांना घडविणारे आहेत. जीवनात अनेक शिखरे पार करायची आहेत. प्रत्येक शिखर चढताना ते जिंकण्याची जिद्द ठेवा. रात्रीचा दिवस करून प्रयत्न करा आणि यश संपादन करा, असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

आपल्या 'झाडाझडती' कादंबरीला पद्मश्री विखे पाटील साहित्य पुरस्कार मिळाल्याच्या आठवणी सांगत त्यांनी प्रवरा व विखे पाटील परिवाराच्या शिक्षण आणि साहित्य क्षेत्रातील योगदानाचे कौतुक केले. मराठी भाषा समृद्ध असून तिचे जतन व संवर्धन करण्यासाठी युवकांनी पुढाकार घ्यावा, असेही त्यांनी सांगितले.

अण्णासाहेब म्हस्के म्हणाले, विश्वास पाटील यांचे साहित्य विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारे आहे. पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांच्या आदर्शावर उभी राहिलेली प्रवरा आज विविध क्षेत्रांत आघाडीवर आहे. विद्यार्थ्यांनी प्रवरेचा अभिमान बाळगून आपले ध्येय निश्चित करावे, असे आवाहन त्यांनी केले.कार्यक्रमात विविध शाळा-महाविद्यालयांतील गुणवंत व क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड यांचाही प्रवरा परिवाराच्या वतीने गौरव करण्यात आला.यावेळी शालिनीताई विखे पाटील, कुलगुरू डॉ. व्ही. एन. मगरे, डॉ. सुस्मिता विखे पाटील, संध्या गायकवाड, कैलासराव तांबे, सोपानराव शिरसाठ, भारत घोगरे, डॉ. शिवानंद हिरेमठ, डॉ. प्रदीप दिघे, लीलावती सरोदे आदींसह शिक्षक, विद्यार्थी व पालक उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. प्रदीप दिघे यांनी केले. सूत्रसंचालन स्नेहल घुले, साक्षी दिघे व डॉ. शांताराम चौधरी यांनी केले.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# गणवेश तपासायचा की विद्यार्थ्यांचे कपडे फाडायचे?

## नमुना तपासण्यासाठी गणवेश कापले, पालकांची तक्रार

**राजेंद्र परदेशी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : गणवेशाची गुणवत्ता तपासण्यासाठी कापडाचा नमुना घ्यायचा म्हणून चक्क विद्यार्थ्यांचे चांगले गणवेश फाडले आणि उर्दू शाळेत तर विद्यार्थ्यांच्या अंगावरील कपडेच फाडून कापडाचे नमुने घेतल्याचा गंभीर आरोप समोर आल्याने राहुरी तालुक्यात शिक्षण विभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तालुक्यातील नऊ केंद्रांमधील शाळांमध्ये हा प्रकार घडल्याची चर्चा असून, पालक व शिक्षकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. गणवेश पुरवठादाराने यापूर्वीच कापडाचे नमुने तपासणीसाठी दिले असताना पुन्हा तपासणीच्या नावाखाली विद्यार्थ्यांच्या शर्ट, पॅन्ट, फ्रॉक आणि सलवारमधून थेट कापडाचे तुकडे घेण्यात आल्याचा आरोप आहे. काही शाळांमध्ये गैरहजर विद्यार्थ्यांचे गणवेश शिल्लक होते.

त्यातील गणवेशही कापून नमुने घेतल्याचे सांगितले जात आहे. विशेष म्हणजे, ज्या विद्यार्थ्यांच्या अंगावरील गणवेशातून कापडाचा नमुना घेतला, त्यांना पुन्हा नवीन गणवेश द्यावा लागणार आहे. त्याचा आर्थिक भार कोण उचलणार, हा प्रश्न आता उपस्थित झाला आहे. गणवेश तपासणीच्या नावाखाली शिक्षकांनाही वेठीस धरले जात असल्याचा आरोप करत शिक्षक संघटना व पालक आक्रमक होण्याच्या तयारीत आहेत. या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी, विद्यार्थ्यांच्या गणवेशाचे नुकसान झाले असल्यास त्याची भरपाई करून द्यावी आणि विद्यार्थ्यांच्या अंगावरील कपडे कापण्यास कोणी आदेश दिले याचीही चौकशी करावी, अशी मागणी पालकांकडून होत आहे. दरम्यान, काही शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्यांनी नाव न छापण्याच्या अटीवर गणवेश खरेदी व कापड तपासणीचे प्रकरण अभिजीत दिपके यांच्याकडेच द्यावे लागते की काय? असा आरोप केला आहे.

**तीन बाय तीन सेंटीमीटरच्या तुकड्यासाठी गणवेशाची कत्तल?**

केंद्रप्रमुखांनी मुलांचा आणि मुलींचा प्रत्येकी एक गणवेश कापून तीन बाय तीन सेंटीमीटरचा कापडाचा तुकडा तपासणीसाठी घेतल्याचे पालकांकडून सांगण्यात आले आहे.केवळ कापडाचा छोटा नमुना घेण्यासाठी संपूर्ण गणवेश खराब झाल्याने पालकांमध्ये नाराजी आहे.

**पुरवठादाराला सोडून विद्यार्थ्यांनाच वेठीस का धरले?**

गणवेशाच्या कापडाची गुणवत्ता तपासायची असेल तर संबंधित पुरवठादाराकडून पुरवठा केलेल्या कापडाचा नमुना घेऊन त्याची तपासणी करता आली असती. किती कापड आणि किती गणवेश पुरविले, याचे प्रमाणपत्र घेऊनही तपासणी करणे शक्य असताना विद्यार्थ्यांच्या गणवेशाचीच तोडफोड करण्याची गरज काय? असा संतप्त सवाल पालकांनी उपस्थित केला आहे.

**आदेश नेमका कोणाचा?**

विद्यार्थ्यांचे चांगले गणवेश कापण्याचे आदेश नेमके कोणी दिले? वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशाचा आधार घेतला जात असेल तर तो आदेश लेखी होता का? उर्दू शाळेत विद्यार्थ्यांच्या अंगावरील कपडे कापण्यास कोणी सांगितले? या प्रश्नांची





उत्तरे शिक्षण विभागाने देण्याची मागणी होत आहे.

**गणवेशाचा खर्च शिक्षकांच्या माथी?**

गणवेश खरेदीची जबाबदारी शाळा व्यवस्थापन समितीवर असताना कापड तपासणीची जबाबदारी मात्र शिक्षकांच्या मागे लावली जात असल्याची भावना काही शिक्षकांनी व्यक्त केली. शासनाकडून गणवेशाची रक्कम वेळेवर मिळत नाही, मिळाली तरी ती अपुरी असल्याच्या तक्रारी आहेत. त्यातच गणवेश खरेदीच्या अटी-शर्तींमुळे अनेक व्यापारी पुरवठा करण्यास इच्छुक नसल्याचेही सांगितले जाते.ज्या विद्यार्थ्यांचे गणवेश फाडले त्या विद्यार्थ्यांना पुन्हा गणवेश देण्याचा भुर्दंड शिक्षकांना बसणार आहे.

**'भीक नको, पण कुत्रं आवरा!'**

गणवेशाच्या प्रश्नावर शिक्षकांमध्ये सध्या 'भीक नको पण कुत्रं आवरा' अशी संतप्त परिस्थिती निर्माण झाल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे. विद्यार्थ्यांचे चांगले गणवेश फाडून नमुने घेण्याची पद्धत नियमबाह्य आहे का, याचे स्पष्टीकरण शिक्षण विभागाने द्यावे, अशी मागणी जोर धरत आहे.

**शासनाच्या नियमानुसारच गणवेश तपासणी : मुख्याध्यापक**

शासनाने ज्या पद्धतीने गणवेश खरेदी करण्याच्या सूचना दिल्या आहेत, त्याच पद्धतीने शाळा व्यवस्थापन समित्यांनी गणवेश खरेदी केला आहे की नाही, याची तपासणी करण्यासाठी वरिष्ठांच्या आदेशानुसार केंद्रप्रमुखांनी गणवेशाचे नमुने तपासणीसाठी घेतले, असे नऊ शाळांतील मुख्याध्यापकांनी सांगितले आहे. मात्र, विद्यार्थ्यांचे गणवेश कापणे अथवा अंगावरील कपड्यांमधून नमुने घेण्याबाबतचा केंद्र प्रमुखांना मिळालेल्या आदेशानुसार ही प्रक्रिया राबविली गेली आहे

**शासनाच्या निकषानुसार गणवेशाची तपासणी : प्रभारी गटशिक्षणाधिकारी**

पुरवठादाराने शासनाने घालून दिलेल्या निकषांनुसार गणवेशाचा कापडाचा पुरवठा केला आहे की नाही, याची खात्री करण्यासाठी शासनाच्या निर्देशानुसार विद्यार्थ्यांना वाटप केलेल्या गणवेशाचे नमुने घेतले जात आहेत. पुरवठादाराने शाळेकडे गणवेशा बरोबर जमा केलेला नमुना कमी साईजचा असल्याने प्रयोगशाळेकरीत पाहिजे त्या आकारात कापडाचा नमुना घेण्यासाठी गणवेशाचे कापडाचा नमुना घेण्यात आला आहे.शाळेजवळ राहणाऱ्या विद्यार्थ्यांना अंगावरील गणवेश बदलून येण्यास सांगून त्या गणवेशाचे नमुने घेण्यात येत आहेत. जिल्हाभर गणवेशाचे नमुने गोळा करण्याचे काम सुरू असून,शासनाच्या आदेशानुसारच ही प्रक्रिया राबविली जात आहे.

**जयश्री कार्ले, प्रभारी गटशिक्षणाधिकारी, राहुरी**

---

## द•ख•ल

### श्रेयश दीक्षित यांचा डिस्ट्रिक्ट गव्हर्नरपदाचा शपथविधी



**श्रीरामपूर** : लायन्स इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३२३४ डी२ (पुणे, अहिल्यानगर व नाशिक) च्या डिस्ट्रिक्ट गव्हर्नरपदी ला. श्रेयश दीक्षित यांचा शपथविधी सोहळा जयराज स्पोर्ट्स अँड कन्व्हेन्शन सेंटर, पुणे येथे उत्साहात संपन्न झाला. इंटरनॅशनल डायरेक्टर ला. सुरज जी बागला यांनी ला. श्रेयश दीक्षित यांना डिस्ट्रिक्ट गव्हर्नरपदाची शपथ दिली. यावेळी प्रथम उपप्रांतपाल ला. राजेंद्र गोयल, संगमनेर येथील सुप्रसिद्ध उद्योजक मालपानी परिवारातील द्वितीय प्रांतपाल ला. सुनीता गिरीशजी मालपानी, तसेच डिस्ट्रिक्ट कॅबिनेटच्या विविध पदाधिकार्यांनी शपथ घेतली.

### कान्हेगाव शाळेचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**श्रीरामपूर** : तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कान्हेगाव शाळेच्या इयत्ता चौथीच्या तीन विद्यार्थ्यांनी प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीत स्थान पटकावले आहे.यावर्षी शाळेतील ६ विद्यार्थी परीक्षेला बसले होते.त्यापैकी ५ विद्यार्थी पात्र ठरले असून ३ विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीत स्थान मिळवले आहे. जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये पल्लवी अनिल काळे (२५४ गुण) जिल्हा गुणवत्ता यादीत ७४ वी,राखी महेश बर्डे (२४४ गुण) जिल्हा गुणवत्ता यादीत २३५ वी, राजवीर गणेश खरात (२४० गुण)जिल्हा गुणवत्ता यादीत २९९ वा यांनी उल्लेखनीय यश मिळवले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांना वर्गशिक्षक गणेश महाडिक यांनी मार्गदर्शक केले. तसेच मनिषा खैरनार,ज्योती जगताप यांचेही सहकार्य लाभले.

### हरेगाव येथे ईद ए मिलाद उत्साहात साजरी

**शिरसगाव** : हरेगाव जामा मस्जिद ट्रस्ट व समस्त मुस्लिम बांधव यांच्या वतीने ईद ए मिलाद आयोजन उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी जामा मस्जिद हरेगाव ते चर्चगेट उंदीरगाव पर्यंत मिरवणूक (जुलूस) काढण्यात आला. या मधूनच सर्व धर्मप्रमुखांना मिठाई देऊन सर्व धर्म समभाव व ऐकतेचा संदेश देण्यात आला. या कार्यक्रम प्रसंगी शिव मारुती देऊळचे सर्व पदाधिकारी, बौद्ध विहारचे सर्व पदाधिकारी तसेच संत तेरेजा चर्चचे सर्व पदाधिकारी तसेच अशोक कारखान्याचे संचालक विरेश गलांडे, नानासाहेब गलांडे, सुनिल शिनगारे, राजेंद्र बांद्रे, सुभाष चोरडिया, विलास साळवे, जितेंद्र गोलवड यांनी समस्त मुस्लिम बांधवाना ईदच्या शुभेच्छा दिल्या. सदर कार्यक्रमास जामा मस्जिद ट्रस्टचे सर्व पदाधिकारी, सदस्य व समस्त मुस्लिमबांधव उपस्थित होते.

### जैविक खत क्षेत्रातील ३५ वर्षांच्या सेवेसाठी डॉ. लक्ष्मण डोळे यांचा 'कृषी सन्मान'



**झरेकाठी** : जैविक खते, सूक्ष्मजीव तंत्रज्ञान आणि मायक्रोबायोलॉजी क्षेत्रात ३५ वर्षांहून अधिक काळ उल्लेखनीय योगदान देणारे ज्येष्ठ शास्त्रज्ञ तथा मल्टिमोल मायक्रो फर्टिलायझर्स इंडस्ट्रीजचे संचालक डॉ. लक्ष्मण साखाहारी डोळे यांना 'झी २४ तास कृषी सन्मान' पुरस्काराने गौरविण्यात आले. झी २४ तास डिजिटलच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय कृषी सन्मान सोहळ्यात त्यांच्या कार्याची दखल घेऊन हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

कृषिमंत्री दत्ता मामा भरणे, आमदार सदाभाऊ खोत यांच्या हस्ते डॉ. डोळे यांना बैलगाडीचे प्रतिकात्मक मॉडेल असलेले सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. डॉ. लक्ष्मण डोळे हे संगमनेर तालुक्यातील झरेकाठी गावचे सुपुत्र आहेत. त्यांच्या या सन्मानामुळे झरेकाठीसह अहिल्यानगर जिल्ह्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, डॉ. सुजय विखे पाटील तसेच जनसेवा युवा मंच झरेकाठीच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

---

## खडगधारी खंडोबा तलवार देवतेचे पूजन



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : नेवासा बुद्रुक येथील खंडोबा बाणाई देवस्थानच्या वतीने पुणतांबा येथील खडगधारी खंडोबा तलवार देवतेचे पिवळे वस्त्र अर्पण करून येळकोट येळकोट जय मल्हारचा जयघोष करत पूजन करण्यात आले.येथील मंदिरात असलेल्या खंडोबादेवाच्या तलवारीचे महात्म्य पुजारी प्रभाकरबाबा शेंडगे यांनी सांगितले. यावेळी साडे पाच फूट असलेल्या खंडोबादेवाच्या तलवारीचे पूजन नेवासा बुद्रुक येथील पुरातन म्हाळसा खंडोबा बाणाई देवस्थान जीर्णोद्धार समितीचे अध्यक्ष संभाजीराव ठाणगे,राजेंद्र काशीद,प्रसिद्धी प्रमुख पत्रकार सुधीर चव्हाण, सदस्य बालू फसले यांच्या हस्ते करण्यात येऊन खंडोबा देवतेला त्यांच्या सासुरवाडी नेवासा बुद्रुक येथून आणलेले पिवळे वस्त्र अर्पण करण्यात आले. यावेळी खडगधारी खंडोबा तलवार देवता मंदिराचे पुजारी प्रभाकरबाबा शेंडगे यांच्या हस्ते म्हाळसानगरीतून आलेल्या सर्व सेवेकऱ्यांचा सन्मान करण्यात आला. खंडोबा देवांनी जेजुरीहुन चंदनापुरीला जातांना ही तलवार पुणतांबा येथे गोदावरीत असलेल्या भिरकुंडामध्ये फेकली ही तलवार शेंडगे घराण्यातील व्यक्तीला सापडली तेव्हा पिढ्यानपिढ्या या तलवार देवतेचे पूजन व जपवणूक शेंडगे घराण्यामार्फत केली जात असल्याचे सांगून या स्थानाची महती सांगितली.यासाठी पुणतांबा येथे खडगधारी खंडोबा तलवार देवतेचे मंदिर ही बांधण्यात आले आहे. नेवासा बुद्रुक येथील पुरातन म्हाळसा खंडोबा बाणाई देवस्थानच्या वतीने पुजारी प्रभाकरबाबा शेंडगे यांचा पिवळे वस्त्र देऊन सन्मान करण्यात येऊन चंपाषष्ठी उत्सवाचे आमंत्रण देण्यात आली.खंडोबा देवतेच्या आरतीने पूजेची सांगता करण्यात आली.

---

## राहाता येथे गुंतागुंतीची थायरॉईड शस्त्रक्रिया यशस्वी

### डॉ.गोरेंनी रुग्णाला दिला मोकळा श्वास



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : राहाता येथील साई अभिनव मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल येथे एक गुंतागुंतीची थायरॉईडची शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पडली आहे. विशेष म्हणजे या रुग्णाला आधीपासूनच डायबिटीज आणि ब्लड प्रेशरचा त्रास होता, त्यामुळे ही शस्त्रक्रिया आव्हानात्मक मानली जात होती. संबंधित रुग्ण गेल्या ३ वर्षांपासून थायरॉईडच्या गाठीच्या त्रासाने त्रस्त होते. गळ्यावर वाढलेल्या गाठीमुळे गळ्यावर सतत ओझे जाणवणे, श्वास घेण्यास त्रास होणे, अन्न गिळताना अडथळा येणे अशा समस्या त्यांना होत होत्या. अनेक ठिकाणी उपचार घेऊनही गाठ कमी होत नव्हती.

अखेर रुग्णाने राहाता येथील साई अभिनव हॉस्पिटलचे डॉ. किरण गोरे यांच्याशी संपर्क साधला. तपासणीनंतर थायरॉईडची गाठ मोठी झाल्याने शस्त्रक्रिया करणे आवश्यक असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. रुग्णाला डायबिटीज आणि बीपी असल्याने सर्व रक्त तपासण्या, हृदयाची तपासणी आणि भूलतज्ज्ञांच्या सल्ल्याने शस्त्रक्रियेची तयारी करण्यात आली. डॉ. गोरे यांनी आपल्या टीमसह ही शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण केली. गाठ काढल्यानंतर रुग्णाला तात्काळ श्वास मोकळा झाल्याचा अनुभव आला आणि गेल्या तीन वर्षांपासून गळ्यावर असलेले ओझे कमी झाले.

सध्या रुग्णाची प्रकृती स्थिर असून तो लवकरच घरी परतणार आहे. नवीन तंत्रज्ञान आणि अनुभवी डॉ गोरे यांचे माध्यमातून येथे मोठ मोठ्या शस्त्रक्रिया यशस्वी होत असल्याने नागरिकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.

**ही केस चॅलेंजींग होती : डॉ गोरे**

गळ्यावरील गाठ बऱ्यापैकी मोठी झाली होती. त्यामुळे श्वसन नलिकेवर दाब येऊन त्यांना श्वास घेण्यास त्रास होत होता आणि सतत गळ्यावर वजन आल्यासारखे वाटत होते. त्यातच त्यांना डायबिटीज आणि बीपीचा त्रास असल्याने ही केस आमच्यासाठी चॅलेंजिंग होती. आम्ही सर्व तपासण्या करून, शुगर आणि बीपी नियंत्रणात आणून भूल तज्ज्ञांच्या सल्ल्याने शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला. ऑपरेशन यशस्वी झाले आणि गाठ पूर्णपणे काढण्यात आली. गाठ निघताच रुग्णाने पहिली प्रतिक्रिया दिली की, 'डॉक्टर आता श्वास अगदी मोकळा झाला आणि गळ्यावरचे ३ वर्षांचे ओझे उतरले'. हेच आमच्या कामाचे खरे समाधान आहे.

---

## खंडाळा हायस्कूलच्या विद्यार्थ्यांची पोलिस स्टेशनला क्षेत्र भेट

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : न्यू इंग्लिश स्कूल, खंडाळा विद्यालयाच्या गुरुकुल प्रकल्पांतर्गत विद्यार्थ्यांसाठी अभ्यास सहलीचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात सुमारे २५० विद्यार्थ्यांनी श्रीरामपूर शहर पोलीस ठाणे आणि रावबहादूर नारायणराव बोरावके महाविद्यालयास भेट दिली. शहर पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक विशाल खैरे, स.पो.नि. राम शिखरे, पोलीस उपनिरीक्षक उमेश चव्हाण, शेलार, हवालदार कदम यांनी विद्यार्थ्यांना पोलीस ठाण्याच्या कामकाजाची सविस्तर माहिती दिली. शेलार यांनी पोलीस दलातील विविध शस्त्रास्त्रे व त्यांच्या वापराविषयी प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. विविध कक्षांची पाहणी करत विद्यार्थ्यांनी पोलीस यंत्रणेची कार्यपद्धती समजून घेतली. त्यानंतर आर.बी.एन.बी. महाविद्यालयात प्राचार्य बडधे, उपप्राचार्य दळवी, प्रा. बनकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रा. संदीप कवडे यांनी बॉटनिकल गार्डन, विविध प्रयोगशाळा, जिमखाना, ए आय लॅब दाखवत महाविद्यालयीन कामकाजाची माहिती दिली. या क्षेत्रभेटीचे नियोजन मुख्याध्यापक एम. एम. बत्तीसे यांच्या मार्गदर्शनाखाली मुकेश देशमुख, सरोज अहिरे, रूपाली पवार, भाऊसाहेब लोंढे, राहुल छल्लारे, सुनील पवार, संगिता बर्डे, कविता कोबरने, शायदा बागवान, निकिता देवकर यांनी केले. मुख्याध्यापक बत्तीसे यांनी दोन्ही संस्थांचे आभार मानले.

---


**सायटेशन नोटीस**

प्रो.फी. जमा.रु.
पान नं, दि.३०.०७.२०२६

**शेवगाव येथील तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी शेवगाव यांचे कोर्टात**

चौ.अ.नं. ४१६

अर्जदार
१. श्री बाबु शिवाजी गोल्हार रा. जवळवाडी ता. पाथर्डी
सामनेवाला
सरकार

सदर अर्जदार हा मौजे जवळवाडी येथील रहीवाशी आहे. सदर अर्जदार श्री. बाबु शिवाजी गोल्हार यांचा मुलाचा श्लोक बाबु गोल्हार यांचा जन्म दि.०५.०३.२०२० रोजी गामीण रुग्णालय शेवगांव ता. शेवगाव जि. अहिल्यानगर असा तहसिल कार्यालय शेवगाव अभिलेखपाल येथे जन्माचा दाखला मिळणे बाबत अर्जदार यांनी अर्ज केला असता अर्जदार यांना नोंदी आढळोत नसल्याचे कळविण्यात आले आहे. जन्म मृत्यु नोंदणी रजिस्टरला नोंद करण्याचे राहुन गेलेले आहे. त्यामुळे अर्जदार यांचे मुलाचा जन्म मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र (जन्म दिनांक नोंदणी दाखला) मिळु शकत नाही. त्यामुळे सदर अर्जदार यांचे शासकीय योजने कामी तसेच वेगवेगळ्या ठिकाणी अडचणींना सामोरे जावे लागत आहे. अर्जदार यांचे मुलाचा जन्म नोंद पंचायत समिती कार्यालय, शेवगाव यांच्या जन्म मृत्यु नोंदणी रजिस्टरला नोंद घेवुन तसा दाखला मिळणे न्यायाचे व गरजेचे आहे. सदरचा दाखला हा शासकीय कामासाठी आवश्यक आहे. सदर अर्जदार याने पंचायत समिती कार्यालय शेवगाव येथे जावुन जन्म मृत्यु प्रमाणपत्राबाबत मागणी केली असता नोंद नसल्याने त्या कार्यालयात जन्म मृत्युची नोंद नसलेबाबत दि.०७.०७.२०२६ रोजीचा दाखला सदर अर्जदारास देण्यात आलेला आहे. जन्म/मृत्युच्या च्या १ वर्षाच्या आत मध्ये जन्म-मृत्यु नोंदणी न झाल्यास केवळ तालुका दंडाधिकारी यांच्या आदेशानेच नोंद घेता येवु शकते. अशी माहिती अर्जदारास ग्रामपंचायत येथे देण्यात आली. अशा परिस्थीती मध्ये सदर अर्जदार यांचा मुलाचा जन्म /मृत्यु नोंद जन्म-मृत्यु नोंदणी रजिस्टरला होणे न्यायाच्या व जरुरीचे आहे त्याकरीता योग्य तो आदेश मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने मे. कोर्टात दाखल केलेला आहे. त्यापेक्षा सदरहुन अर्जदाराचे सदरहु जन्म-मृत्यु नोंदीबाबत कोणास काही एक म्हणावयाचे असेल तर हया जाहीर नोटीसीच्या तारखेपासुन एक महिन्याचे आत दि. १०/०९/२०२६ पुर्वी त्याने हया कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात. आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहून मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्या तर सदरहून कोर्ट अर्जदार यांचे हक्काबदल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास जन्म-मृत्यु नोंद घेणेबाबत आदेश करतील. आज दि. ३०/०७/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी नोटीस दिले असे.

शिक्का सही/- हुकमावरुन
**तहसिलदार शेवगाव तथा तालुका दंडाधिकारी शेवगाव**

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, डि ।। अहिल्यानगर सब डि ।। ता. कर्जत पैकी मौजे वालवड हद्दीतील नामे श्री. अरुण भाऊ राऊत यांचे मालकीची शेत जमीन मिळकत गट नं. २३८/२ क्षेत्र ४ हे. ०९ आर, आकार ३ रु. २४ पैसे पैकी क्षेत्र ०.१५.०० हे. आर., स्वे. मीटर यांसी चतु: सिमा पुर्वेस गट नं. २३८/२ पै. रस्त्यासाठी सोडलेले शिल्लक क्षेत्र व गट नं. २२३/१, दक्षिणेस जामखेड श्रीगोंदा रोड, पश्चिमेस गट नं. २३८/२ पैकी सिमा बापु राऊत व नंदा शिवाजी राऊत यांचे क्षेत्र व उत्तरेस गट नं. २३८/२ पैकी अरुण भाऊ राऊत यांचे उर्वरीत क्षेत्र ही मिळकत श्री. अरुण भाऊ राऊत रा. वालवड, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर यांचे मालकी हक्क प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीची आहे. सदर वरील जमीन मालकाने त्यांचे हिश्या पैकी ०.१५.०० हे.आर.स्वे.मीटर. क्षेत्र त्यांचे एकत्र हिंदु कुटुंबाचे कायदेशीर गरजेपोटी आमचे अशिलास कायम खुश खरेदी देणेचे मान्य व कबुल करुन त्याप्रमाणे सौदाबोलणी होऊन वरील जमीन मालकाने आमचे अशिलाकडून विसारापोटी रक्कमही स्विकारलेली आहे. तसेच वरील जमीन मालकाने सदर मिळकतीवरील त्यांचा मालकी हक्क कब्जा निर्वेध व निजोखमी असल्याचा भरवसा व निर्वाळा आमचे अशिलास दिलेला आहे. तथापि सदर मिळकतीवर त्यांचेशिवाय इतर कोणाचाही खरेदी, विक्री, गहाण, दान, लिज, लिन बक्षीसपत्र, इच्छापत्र, पोटगी, भाडेपट्टा, वारसहक्क इ. कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बोजे असल्यास अशा व्यक्तींनी प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७दिवसाचे आत आम्हास खालील पत्त्यावर व सेलफोनवर आपली लेखी अगर तोंडी हरकत कळवावी व आपला हक्क कागदोपत्री शाबीत करुन द्यावा व आमची खात्री पटवून द्यावी. अन्यथा सदर मिळकत ही निर्वेध, निजोखजी, बोजाविरहीत आहे असे गृहीत धरुन अथवा ज्याचा कोणाचा कसल्याही प्रकारचा तथाकथीत हक्क हितसंबंध इ. असल्यास तो त्यांनी जाणीवपुर्वक सोडून दिला आहे असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर कोणाचीही, कसलीही तक्रार चालणार नाही. तसेच तशी हरकत सदर मिळकतीवर व आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. कळावे ही नोटीस दिली असे.

**स्थळ : कर्जत**
**दिनांक : २७/०८/२०२६**

सही/-
**(आर.बी. दहिवळकर)**
शिक्का
ॲडव्होकेट
नोटरी पब्लीक (भारत सरकार) कोर्ट गल्ली,
कर्जत, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर

**जाहिर प्रगटन**

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांकः जन्म-मृत्यु/एस/आर/२५५/२०२६
नेवासा दिनांक : १८/०८/२०२६

अर्जदार श्री श्रीम-हिरा त्रिंबक कसबे, रा. निपाणी निम गांव, ता. नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन श्री/श्रीम./कु. हिरा त्रिंबक कसबे, रा. निपाणी निमगांव, ता. नेवासा यांचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे. सदरच्या अर्जात खालील प्रमाणे जन्म नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.

अ.क्र.१, जन्म नोंद घेण्यात येणा-या व्यक्तीचे नाव-हिरा त्रिंबक कसबे, गावाचे नाव-निपाणी निमगांव, जन्म दिनांक-१०/०५/१९६८

करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटना तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

**तहलिसदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**


---

# बहिणीने भावाला दिली आयुष्याची 'राखी'

## किडनी दान करून दिले जीवनदान



**शंकर सोनवणे । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर** : रक्षाबंधन म्हणजे भाऊ-बहिणीच्या प्रेमाचा, विश्वासाचा आणि जिव्हाळ्याचा सण. मात्र, अहिल्यानगर जिल्ह्यातील चंद्रकला कंदळकर यांनी या नात्याची अनोखी आणि हृदयस्पर्शी कहाणी घडवली आहे.

भावाची प्रकृती गंभीर असल्याचे समजताच त्यांनी स्वतःची किडनी दान करून भावाला नवजीवन दिले. त्यांच्या या निःस्वार्थ त्यागामुळे रक्षाबंधनाच्या सणाला खऱ्या अर्थाने जीवनदानाची किनार लाभली आहे. भाऊराव पांडुरंग साबळे (४८) यांना गंभीर आजारामुळे लोणी (ता. राहाता) येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील प्रवरा ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तपासणीनंतर किडनी प्रत्यारोपण हाच पर्याय असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. भावाची बिघडलेली प्रकृती पाहून चंद्रकला यांनी क्षणाचाही विलंब न करता स्वतःची किडनी दान करण्याचा निर्णय घेतला. मे महिन्यात तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने किडनी प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया यशस्वीपणे केली. आता रक्षाबंधनाच्या निमित्ताने बहिणीने भावाच्या मनगटावर राखी बांधली, तेव्हा दोघांच्याही डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. रक्ताच्या नात्याला त्यागाची जोड देणारी ही घटना समाजासाठी माणुसकीचा आणि नात्यातील निःस्वार्थ प्रेमाचा प्रेरणादायी आदर्श ठरली आहे.


**जाहीर नोटीस**

नि.२५

**परिशिष्ट ब**
**आदेशिका क्रमांक १**
**दिवाणी न्यायालय क. स्तर, शेवगाव**
**श्री. डी. आर. कुलकर्णी यांचे न्यायालयात**
**दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, शेवगाव, शेवगाव, अहमदनगर,**

दावा निकालात काढण्यासाठी समन्स
(आदेश ५, नियम १, ५)
सरनामा

नियमित दिवाणी दावा/४४१/२०१९
अनिता मुकुंदराव देशमुख वि. काकासाहेब रंगनाथ देशमुख
पुढील तारिख : २२-०९-२०२६

प्रति,
चैताली काकासाहेब देशमुख वय: २७
पत्ता: रा. बालमटाकळी, ता शेवगावं, जि. अ.नगर, बलंटाकली, शेवगाव, Ahmednagr, Maharashtra

ज्याअर्थी अनिता मुकुंदराव देशमुख, यांनी तुमच्याविरुध्द बद्दल या न्यायालयात दावा दाखल केला आहे; म्हणून, सदर दाव्याचा जबाब देण्यासाठी २२-०९-२०२६ रोजी मध्यान्ह ११ वाजता या न्यायालयात जातीने, किंवा ज्यास यथायोग्य सूचना दिलेल्या असून जो वादासंबंधीच्या सर्व महत्त्वाच्या प्रश्नांची उत्तरे देऊ शकेल अशा किंवा अशा सर्व प्रश्नांची उत्तरे देऊ शकणारी व्यक्ती ज्याच्याबरोबर असेल अशा वकिलामार्फत हजर होण्यासाठी तुम्हाला याद्वारे बोलावण्यात येत आहे व तुमच्या हजेरीसाठी ठरवलेला दिवस दाव्याच्या अंतिम निर्णयासाठी नेमलेला दिवस असल्यामुळे, तुमच्या बचावाच्या पुष्ट्यर्थ तुम्ही ज्या साक्षीदारांच्या साक्षीपुराव्याचा व ज्या दस्तऐवजांचा आधार घेऊ इच्छिता ते सर्व साक्षीदार व सर्व दस्तऐवज त्या दिवशी हजर करण्याची तुमची तयारी असलीच पाहिजे. उपरोक्त दिवशी हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत दाव्याची सुनावणी होऊन निर्णय देण्यात येईल याची दखल घ्यावी.

आज २५-०८-२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**हुकुमावरुन**
**दिवाणी न्यायाधीश क स्तर, शेवगाव**

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस कळविण्यात येते की, मी निता सुनील पवार, वय ३५ वर्षे, व्यवसाय घरकाम, रा. खंडोबा वस्ती, निळवंडे, संगमनेर, जि. अहिल्यानगर, या ठिकाणची रहिवासी असून माझे पती कै. सुनील शिवाजी पवार यांचे दिनांक २८/१२/२०२५ रोजी निधन झाले आहे.

मयत सुनील शिवाजी पवार यांच्या नावे जेसीबी इंडिया लिमिटेड कंपनीची जे.सी.बी. मॉडेल ०३/२०२४, रजिस्ट्रेशन क्रमांक MH-17-CK-9960 असे वाहन आहे.

मयत सुनील शिवाजी पवार यांची पत्नी निता सुनील पवार ही त्यांची कायदेशीर वारस असून त्या सज्ञान आहेत. सदर वाहन माझ्या (निता सुनील पवार) नावे ट्रान्सफर करण्यासाठी अर्ज व मृत्युदाखला इत्यादी सर्व कागदपत्रे आर.टी.ओ. ऑफिस, श्रीरामपूर या कार्यालयात दाखल केलेली आहेत.

सदर मयत सुनील शिवाजी पवार यांच्या नावे असलेले जेसीबी इंडिया लिमिटेड कंपनीचे जे.सी.बी. मॉडेल ०३/२०२४, रजिस्ट्रेशन क्र. MH-17-CK-9960, त्यांच्या कायदेशीर वारस पत्नी निता सुनील पवार यांच्या नावे ट्रान्सफर करण्यास कोणाचीही हरकत, अधिकार, हक्क इत्यादी असल्यास संबंधितांनी आपली हरकत/तक्रार लेखी स्वरूपात योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह आर.टी.ओ. ऑफिस, श्रीरामपूर अथवा निता सुनील पवार, वय ३५ वर्षे, व्यवसाय – घरकाम, रा. खंडोबा वस्ती, निळवंडे, संगमनेर, जि. अहिल्यानगर, यांच्याकडे ही जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत संपर्क साधून सदर कागदपत्रे व हरकत प्रत्यक्ष सादर करावी.

सदर मुदतीत कोणाचीही लेखी हरकत अथवा लेखी तक्रार न आल्यास, संबंधितांनी सदर वाहनाबाबतची हरकत, अधिकार, हक्क वगैरे जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

ही नोटीस प्रसिद्धीची तारीख : २०/०८/२०२६

**सौ. निता सुनील पवार**

# प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांची रिक्त पदे तातडीने भरावीत

## अन्यथा १ सप्टेंबर पासून उपोषणाचा खा. निलेश लंकेचा इशारा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** जिल्ह्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील शिक्षकांची रिक्त पदे तातडीने भरावीत. शिक्षकांवरील अशैक्षणिक कामांचा वाढता भार कमी करावा आणि शिक्षकांच्या कमतरतेमुळे विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान थांबवावे. या मागण्यांसाठी खा. निलेश लंके यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. या मागण्यांवर ३१ ऑगस्ट पर्यंत ठोस निर्णय व लिखित कृती आराखडा न मिळाल्यास १ सप्टेंबर पासून जिल्हा परिषद आवारात उपोषण करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

खा. निलेश लंके यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे की,जिल्ह्यातील शिक्षकांचे रिक्त पदांचा प्रश्न गंभीर आहे. उपलब्ध अधिकृत आकडेवारीनुसार प्राथमिक व पदवीधर शिक्षक संवर्गातील ४ ७१ तर माध्यमिक विभागातील २०५४ पदे अशी एकूण २५२५ शिक्षकांची पदे रिक्त असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. प्रत्येक शिक्षकांमागे २० विद्यार्थी गृहीत धरल्यास सुमारे ५० हजाराहून अधिक विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर याचा परिणाम होत असल्याचा दावा खा. लंके यांनी केला आहे. एकीकडे हजारो शिक्षकांची पदे रिक्त असताना कार्यरत असणाऱ्या शिक्षकांना अध्यापना व्यतिरिक्त विविध अशैक्षणिक कामे करावी लागत असल्याकडे लंके यांनी लक्ष वेधले आहे. मतदार यादी पुनर्नरीक्षण, जनगणना व विविध शासकीय सर्वेक्षण, ऑनलाइन पोर्टलवर माहिती भरणे, विद्यार्थ्यांचे आधार कार्ड व बँक खाते, पोषण आहार नोंदणी, आरोग्य विषयक नोंदणी तसेच विविध योजनांचे अहवाल व ऑनलाईन कामे शिक्षकांवर सोपवली जात असल्याचे त्यांनी म्हटले आहे. शिक्षकांचा अध्यापनाचा वेळ अशा कामांमध्ये खर्च होत असल्यास विद्यार्थ्यांना गुणवत्ता पूर्ण शिक्षण कसे मिळणार असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. शिक्षकांच्या प्रश्न हा केवळ कर्मचारी विषयक प्रश्न नसून तो विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्य अशी थेट संबंधित असल्याचे त्यांनी



स्पष्ट केले. शिक्षकांची हजारो पदे रिक्त असताना ती भरण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली? आवश्यक प्रस्ताव व पाठपुरावा वेळेत का करण्यात आला नाही? विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीची जबाबदारी कोणाची? तसेच कार्यरत शिक्षकांवर पडलेल्या अतिरिक्त कामाच्या भाराची जबाबदारी कोणाची ?असे प्रश्न खा. लंके यांनी उपस्थित केले आहेत. शिक्षकांचा प्रत्यक्ष अध्यापनाचा वेळ आणि अशैक्षणिक कामांसाठी जाणारा वेळ याचा प्रशासनाने आढावा घेतला आहे का? याबाबतही त्यांनी खुलासा मागितला आहे. जिल्ह्यातील सर्व रिक्त शिक्षक पदे तातडीने भरण्यासाठी अंतिम मुदतीसह कालबाह्य कृती आराखडा जाहीर करावा. प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील रिक्त पदांची शाळा निहाय विषयनिहाय व संवर्गनिहाय अंतिम यादी जाहीर करावी. ३१ ऑगस्ट पर्यंत ठोस निर्णय व लेखी कृती आराखडा न मिळाल्यास १ सप्टेंबर पासून जिल्हा परिषदेच्या आवारात उपोषण करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा खासदार लंके यांनी दिला आहे.

# द•ख•ल

## निवडुंगे येथे कडी-कोयंडा उचकावून ६१ हजारांचा ऐवज लंपास

**पाथर्डी शहर :** पाथर्डी तालुक्यातील निवडुंगे गावात भरदिवसा घरफोडीची धाडसी घटना घडल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. घरातील सदस्य पाहुण्यांना भेटण्यासाठी बाहेर गेल्याची संधी साधत



अज्ञात चोरट्याने घराचा कडी-कोयंडा उचकावून आत प्रवेश केला आणि सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा ६१ हजार ३०५ रुपयांचा ऐवज लंपास केला. ही घटना गुरुवारी उघडकीस आली. याप्रकरणी भरत बाबासाहेब मरकड (रा. निवडुंगे, ता. पाथर्डी) यांनी पोलिसांकडे फिर्याद दिली आहे. मरकड हे पत्नी सुरेखा व दोन मुलांसह निवडुंगे येथे वास्तव्यास असून शेती व्यवसायातून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. ड्रेसिंग टेबलमध्ये ठेवलेले सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम जागेवर नसल्याने त्यांनी घरात सर्वत्र शोधाशोध केली; मात्र ऐवजाचा मागमूस लागला नाही. अखेर अज्ञात चोरट्याने संधी साधून घरफोडी केल्याचे स्पष्ट झाले. चोरट्याने तीन सोन्याच्या अंगठ्या, सोन्याची गळ्यातील चैन आणि तीन हजार रुपये रोख असा एकूण ६१ हजार ३०५ रुपयांचा मुद्देमाल चोरून नेल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पाथर्डी पोलीस पुढील तपास करीत आहेत.

## अहिल्यानगर जिल्हा स्वयंसेवी अधिकारीपदी तिघांची नियुक्ती

**श्रीगोंदा :** राष्ट्रीय लोक शिकायत एवं जाँच आयोगाच्या अहिल्यानगर जिल्हा स्वयंसेवी अधिकारी म्हणून बेलवंडी बुद्रुक येथील नारायण मारुती हिरवे, अरुण मधुकर शेलार आणि अंबादास दत्तात्रेय लबडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती २५ ऑगस्ट २०२६ रोजी करण्यात आली.तिन्ही नवनियुक्त स्वयंसेवी अधिकारी हे बेलवंडी बुद्रुक, ता. श्रीगोंदा येथील रहिवासी असून सामाजिक कार्यात सक्रिय आहेत. नागरिकांच्या विविध प्रश्नांवर मदत करणे, सामाजिक विषयांबाबत जनजागृती करणे तसेच गरजू घटकांच्या समस्या प्रशासनाच्या निदर्शनास आणून देण्यासाठी त्यांनी यापूर्वीही सहभाग घेतला आहे.राष्ट्रीय लोक शिकायत एवं जाँच आयोगाच्या माध्यमातून नागरिकांच्या तक्रारी, सामाजिक समस्या आणि जनहिताच्या प्रश्नांना योग्य व्यासपीठ मिळवून देण्यासाठी तिन्ही अधिकारी कार्यरत राहणार आहेत. नागरिक आणि प्रशासन यांच्यातील दुवा म्हणून काम करताना सामाजिक प्रश्नांना प्रभावीपणे वाचा फोडण्याची जबाबदारी त्यांच्यावर राहणार आहे.या नियुक्तीमुळे बेलवंडी बुद्रुकसह श्रीगोंदा तालुक्याच्या सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या तिघांच्या कामाला नवी दिशा मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.दरम्यान, या नियुक्तीबद्दल बेलवंडी बुद्रुक परिसरातील नागरिक, सामाजिक कार्यकर्ते तसेच विविध स्तरांतून नारायण हिरवे, अरुण शेलार आणि अंबादास लबडे यांचे अभिनंदन करण्यात येत असून, त्यांच्या पुढील सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा देण्यात येत आहेत.

## श्रीगोंद्यात घरफोडी ४७ हजारांचा ऐवज लंपास

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यातील मांडवगण रोडवरील आळेकर मळा येथे अज्ञात चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून घरात प्रवेश करत सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम असा एकूण ४७ हजार ४०० रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना गुरुवारी (२७ ऑगस्ट) पहाटे



उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. याबाबत नितीन पोपट रोही (रा. आळेकर मळा, मांडवगण रोड, श्रीगोंदा) यांनी श्रीगोंदा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.फिर्यादीनुसार, रोही हे पत्नी व दोन मुलांसह राहतात. बुधवारी रात्री नेहमीप्रमाणे कुटुंबीयांनी जेवण करून रा त्री सुमारे ११ वाजता घरात झोप घेतली. गुरुवारी पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास नितीन रोही यांना जाग आली. शेतातील तळ्यात तसेच घरामध्ये पाणी भरायचे असल्याने ते उठले आणि घराचा दरवाजा उघडण्यासाठी गेले. मात्र दरवाजा उघडत नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. पोलिसांनी घटनास्थळी येऊन पाहणी केली. अज्ञात चोरट्याने घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला आणि पेटी उचकटून ऐवज चोरून नेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. या प्रकरणी नितीन रोही यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध श्रीगोंदा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांकडून चोरट्याचा शोध सुरू आहे. परिसरातील घरफोड्यांच्या घटनांना आळा घालण्यासाठी रात्रीची गस्त वाढविण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.



## कर्जतमध्ये ईद-ए- मिलादुन्नबी विविध उपक्रमांनी साजरी

**कर्जत :** सकल मुस्लिम समाज कर्जतच्यावतीने बुधवारी कर्जत शहरात ईद-ए-मिलादुन्नबी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी सर्वधर्मीयांनी मुस्लिम बांधवांस शुभेच्छा देत सामाजिक ऐक्याचे सुंदर दर्शन दिले. संध्याकाळी सहा वाजता मक्का-मदिना प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात आली. याप्रसंगी ठिकठिकाणी मिरवणुकीचे स्वागत करण्यात आले. बुधवार रोजी सकल मुस्लिम समाज कर्जतच्यावतीने कर्जत शहरात ईद-ए-मिलादुन्नबी विविध सामाजिक उपक्रमांनी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. मंगळवारी ईदच्या निमित्ताने सकल मुस्लिम जमात कर्जत यांच्यावतीने मराठी मुलांच्या शाळेत रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. यात अनेक रक्तदात्यानी सहभाग घेत रक्तदान केले. रक्तदात्याना मुस्लिम समाजाच्यावतीने भेटवस्तू देण्यात आली. यावेळी सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांनी भेट देत या उपक्रमाचे कौतुक करीत संयोजकाचे आभार मानले. बुधवारी ईद-ए-मिलादुन्नबी निम्मित सर्वधर्मीयांनी शुभेच्छा देत सामाजिक ऐक्याचे सुंदर दर्शन दिले. संध्याकाळी सहाच्या सुमारास जामा मशीद येथून भव्य मिरवणुकीस प्रारंभ झाला. यात मक्का-मदिनाची आकर्षक प्रतिमा ठेवण्यात आली होती. पुढे तरुणाई इस्लामिक नाथ, देशभक्ती गीत यासह महापुरुषांच्या जागर गीतावर शिस्तीत चालत होती. यात लहान मुलांचा उत्साह वाखाण्याजोगा होता. तर मिरवणुकीपुढे फटाक्यांची आतिषबाजी करण्यात येत होती. या मिरवणुकीचे ठीकठिकाणी स्वागत करण्यात आले. यावेळी पोलीस निरीक्षक हनुमान गायकवाड यांनी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता.

# श्रीगोंद्यातील प्रस्तावित एमआयडीसी अतिक्रमणावर प्रशासन ॲक्शन मोडवर

## सिव्हील विभागाला चौकशीचे आदेश : गणेश राठोड

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**बेलवंडी :** श्रीगोंदा तालुक्यातील पार्वतवाडी व पिसोरे बुद्रुक येथील ६२४ एकर प्रस्तावित एमआयडीसीच्या जमिनीपैकी जवळपास १०० एकर क्षेत्रावर खाजगी शेतीचे अतिक्रमण झाल्याचे वृत्त प्रसिद्ध होताच एमआयडीसी प्रशासनात खळबळ उडाली आहे. या बातमीची गंभीर दखल घेत एमआयडीसीचे मुख्य प्रशासकीय अधिकारी गणेश राठोड यांनी प्रशासनाची अधिकृत भूमिका स्पष्ट केली असून, याप्रकरणी चौकशी व कायदेशीर कारवाईचे आदेश दिले आहेत.

'गणेश राठोड यांनी सांगितले की, प्रस्तावित एमआयडीसीच्या जागेवरील अतिक्रमाणाबाबत प्रसिद्ध झालेल्या बातमीची तात्काळ दखल घेण्यात आली आहे. एमआयडीसीच्या कायद्यानुसार अतिक्रमण हटवण्याची मुख्य जबाबदारी ही आमच्या सिव्हिल विभागाची (बांधकाम विभाग) असते. त्यामुळे उपअभियंता संदीप बडगे आणि त्यांच्या टीमला या बातमीची प्रत पाठवून जागेची सखोल पडताळणी करण्याचे निर्देश दिले आहेत.

जागेवर सुरू असलेला ऊस, डाळिंब व पपई या पिकांची नोंद, त्यांना असलेली वीज जोडणी, तसेच संबंधित ऊस कोणत्या कारखान्याला घालवला जात आहे याची सर्व माहिती संकलित केली जाणार असून सर्व प्रथम एमआयडीसीचे सर्व्हे अर आणि सिव्हिल विभाग प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी करेल. जर एमआयडीसीच्या अधिग्रहित जागेत खाजगी शेतीचे अनधिकृत अतिक्रमण निष्पन्न झाले, तर संबंधित व्यक्तींवर नियमानुसार कठोर कायदेशीर कारवाईचा प्रस्ताव तयार करून पुढील पावले उचलली जातील. सीमांकन आणि कुंपणाबाबत स्पष्टीकरण देताना राठोड यांनी सांगितले की, एमआयडीसीच्या या भूखंडावर पायाभूत सुविधा पुरवण्यासाठी (रस्ते, वीज, पाणी आणि ड्रेनेज लाईन) टेंडर प्रक्रिया (निविदा) सध्या अंतिम टप्प्यात आहे. कंत्राटदार निश्चित होताच प्रत्यक्षात विकासकामांना सुरुवात होईल.

**अतिक्रमणधारकांचे धाबे दणाणले!**

शासकीय ताबा असलेल्या ६२४ एकर जागेत गेल्या दोन वर्षांपासून बिनधास्तपणे सुरू असलेल्या शेती आणि ८ महिन्यांपासून झालेल्या मातीचोरीच्या पार्श्वभूमीवर, आता मुख्य प्रशासकीय अधिकाऱ्यांनीच थेट चौकशीचे आदेश दिल्याने परिसरातील अतिक्रमणधारकांचे आणि संशयितांचे धाबे दणाणले आहेत. आता सिव्हिल विभाग जागेवर जाऊन कधी पाहणी करून कारवाई करतो, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# टाकळी ढोकेश्वरमध्ये पठार केसरी बैलगाडा स्पर्धेचा थरार

## आ. दाते यांच्या हस्ते शुभारंभ; बैलगाडा घाटासाठी १० लाखांचा निधी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**




**निघोज :** पारनेर तालुक्यातील पठार भागातील टाकळी ढोकेश्वर येथे पारनेर तालुका पठार केसरी बैलगाडा शर्यतीचा उत्साहात समारोप झाला. तीन दिवस रंगलेल्या या स्पर्धेला पुणे व नगर जिल्ह्यातील बैलगाडा मालक व स्पर्धकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. जुन्नर, आंबेगाव परिसरातूनही मोठ्या संख्येने बैलगाडा स्पर्धक सहभागी झाले होते.

या बैलगाडा स्पर्धेच्या निमित्ताने टाकळी ढोकेश्वर येथील बैलगाडा घाटासाठी आमदार काशिनाथ दाते यांनी १० लाख रुपयांचा निधी मंजूर केल्याचे जाहीर करण्यात आले. त्यामुळे बैलगाडा शर्यतींसाठी आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्यास मोठी मदत होणार असून परिसरातील बैलगाडा शर्यतप्रेमींमध्ये समाधान व्यक्त करण्यात आले. शनिवार रोजी स्पर्धेच्या पहिल्या दिवशी तब्बल १५० हून अधिक बैलगाड्यांनी सहभाग घेतला. घाटात बैलांच्या टापांचा आवाज, 'भिर्र'च्या आरोळ्या, ढोल-ताशांचा गजर आणि तुतारीच्या निनादामुळे संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. सकाळपासून सुरू झालेल्या शर्यती संध्याकाळपर्यंत रंगल्या. पंचक्रोशीतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या रोमांचक स्पर्धेचा आनंद घेतला.

आ. काशिनाथ दाते, प्रशांत गायकवाड, बाबासाहेब खिलारी यांच्या हस्ते बैलगाडा घाटाचे उद्घाटन करून बैलगाडा शर्यतींना प्रारंभ करण्यात आला. तीन दिवसांच्या स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या बैलगाडा मालकांनी मानाचे क्रमांक पटकावले. शनिवार रोजी दत्तात्रय काळनर यांनी प्रथम क्रमांक मिळविला. रविवार रोजी उत्तम गाडगे व राजवर्धन आढाव यांनी प्रथम क्रमांक पटकावला. तर सोमवार रोजी दत्तात्रय आंधळे यांनी प्रथम क्रमांक मिळविला. स्पर्धेच्या आयोजनासाठी धनंजय निमसे, संतोष चौगुले, बाळशिराम पायमोडे, गणेश कोकाटे, दत्ता घुले, सोपान माने, बंडू मोरे, भैय्या इनामदार, कैलास ठुबे, बाळासाहेब लगड, बाळासाहेब रोकडे, विजय लोमटे, अंकुश ठुबे, विलास घोलप, गितेश तमनर, ऋषिकेश कोकाटे, माऊली बेलकर, सुनील आहेर, राहुल भाईक, विलास भाईक, शिवाजी उंडे, दत्तात्रय काळनर, विनायक बेलकर, नवनाथ पायमोडे, भाऊसाहेब गोरडे, जयसिंग जाधव व संदीप कुलट, शिवाजी खिलारी, बाळकृष्ण पायमोडे, मळिभाऊ रांधवण, विक्रमशेठ झावरे, गणेश चव्हाण, आदी उपस्थित होते.



# परमार्थ करताना चित्त एकाग्र ठेवा : ह.भ.प राघवानंद महाराज

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सुपा :** सद्गुरूची शरणागती करा. परमार्थ करताना चित्त एकाग्र करा, देवाची व संतांची संगत धरा, नामामुळे बंधने संपतात म्हणून नामस्मरण करा. देवांना जेवढा त्रास झाला तेवढा आपण सहन करू शकत नाही. श्रीकृष्णाचा जन्म तुरुंगात झाला, आपण एसी रूममध्ये जन्माला येतो. भगवंताचा आनंद घ्यायचा असेल तर मुक्त असावे लागते. सद्गुरूच्या नामामुळे आपल्या हातून चुकीचे काही होणार नाही, अशा प्रकारचा उपदेश ह.भ.प राघवानंद महाराज साबळे यांनी कीर्तनातून केला. पारनेर तालुक्यातील रायतळे येथील सद्गुरू शांतानंद महाराज आनंदाश्रमात आयोजित कार्यक्रमात ह.भ.प राघवानंद महाराज साबळे बोलत होते. दि. २४ ते २५ या कालावधीत सुरू असलेल्या सोमवारी सकाळी ह.भ.प गोरक्ष महाराज बनकर यांनी हरिकिर्तनातून संताचे विचारनेच भारत प्रगत आहे हे संताचे विचार मांडले. दुपारी संतपूजनात आनंदाश्रमवर परिसरातील संताचे पूजन झाले त्यानंतर आश्रमावरीत साधकांचा हरिपाठ छान झाला. संध्याकाळी भागवताचार्य नरेश महाराज ठाकरे यांनी शांत व समाधानी जीवनाचे महत्व किर्तनात विषद केले. कार्यक्रमास राणीताई लंके, शरद झोंडगे, सचिन पठारे, बापूसाहेब डोके, शिवजीत डोके, राजेंद्र शेडाळे, प्रसाद डोके, संभाजी पवार, रमेश धोंडे, शिवाजी व्यवहारे व परिसरातील राजकिय सामाजिक क्षेत्रातील पदाधिकारी व आनंदाश्रम रायतळे सर्व साधक वृंद, पंचक्रोशीतील भाविक व ग्रामस्थ उपस्थित होते.

# पारनेर तालुक्यात मतदारयादी शुद्धीकरण; ३८ हजार ५३६ नावे कमी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मयत, स्थलांतरित, दुबार व अनुपस्थित मतदारांची नावे वगळली; मतदारसंख्या ३ लाख ५८ हजार १६६**

**निघोज :** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सुरू असलेल्या मतदारयादी शुद्धीकरण मोहिमेंतर्गत पारनेर तालुक्यातील मतदारसंघात विशेष गहन पुनरिक्षण अर्थात सर्वेक्षणाचे काम १४ ऑगस्टपर्यंत पूर्ण करण्यात आले आहे. या सर्वेक्षणादरम्यान ३८ हजार ५३६ मतदार असंकलित आढळून आल्याने त्यांची नावे मतदारयादीतून वगळण्यात आली आहेत. त्यामुळे तालुक्यातील सध्याची एकूण मतदारसंख्या ३ लाख ५८ हजार १६६ इतकी झाली आहे. निवडणूक यंत्रणेकडून घराघरात जाऊन करण्यात आलेली पाहणी, दारोदारी सर्वेक्षण तसेच उपलब्ध कागदपत्रांची पडताळणी या माध्यमातून मतदारांची माहिती तपासण्यात आली. या प्रक्रियेत मयत, कायमस्वरूपी स्थलांतरित, दुबार नावे तसेच प्रत्यक्षात आढळून न आलेल्या मतदारांची नावे निश्चित करण्यात आली.

मतदारयादी अधिक पारदर्शक, अचूक आणि त्रुटीरहित करण्याच्या उद्देशाने हे सर्वेक्षण करण्यात आले. दुबार नावे, स्थलांतरित मतदार आणि मयत व्यक्तींची नावे वगळल्यामुळे मतदारयादीतील संभाव्य गोंधळ कमी होण्यास मदत झाली आहे.

सर्वेक्षणानंतर तालुक्यातील मतदारसंख्या ३ लाख ५८ हजार १६६ इतकी राहिली आहे. मतदारयादीत नाव नसल्यास अथवा नाव, पत्ता किंवा अन्य तपशिलात दुरुस्ती आवश्यक असल्यास संबंधित मतदारांनी बूथ लेव्हल अधिकारी (इडज) किंवा निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळाचा वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. नवीन मतदारांच्या नोंदणीसाठीचा पुढील कालावधी अद्याप जाहीर करण्यात आलेला नाही.

मतदारयादी शुद्धीकरणामुळे आगामी निवडणुकांमध्ये मतदान प्रक्रिया अधिक सुलभ व पारदर्शक होण्यास मदत होणार असून, दुबार अथवा अपात्र नोंदी कमी झाल्याने बोगस मतदानाला आळा बसण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# आज कानिफनाथांचा पालखी सोहळा



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**तिसगाव :** श्री क्षेत्र मढी येथे तिसऱ्या श्रावणी शुक्रवार निमीत्त राज्यभरातून पालख्या वाजत गाजत श्रीक्षेत्र मढी येथे दाखल झाल्या आहेत. भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेऊन कानिफनाथ मंदिर परिसरात सुरक्षेच्या दृष्टिकोनातून सीसीटीव्ही कॅमेरे दर्शनासाठी येणार्या भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी पोलिस मित्र व मंदिर विश्वस्त मंडळातर्फे विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत. मागील वर्षी श्रावणी शुक्रवार निमित्त सुमारे एक लाख लाखांवर भाविकांनी दर्शन घेतले होते. यंदा भाविकांची संख्या वाढण्याची शक्यता गृहीत धरून मढी देवस्थान समिती मंदिर परिसरात गर्दीचे व्यवस्थापन करणार आहे. प्रत्येक श्रावणी शुक्रवारी मढी गावातुन नाथांचा पालखी व घोडयाची गावातुन वाजत गाजत मिरवणुक निघते मलिदा प्रसाद वाटप केले जाते. तिसऱ्या शुक्रवारी मात्र पालखी सोहळ्याला यात्रेचे स्वरूप येते पुणे, कल्याण, नाशीक, इगतपुरी, बारामती लोणावळा, नगर, बिड येथुन पायी पालख्या वाजत गाजत मढी येथे कानीफनाथांच्या उत्सवासाठी येतात विविध प्रकारे नाथांची पुजा करत फटक्यांची आताष बाजी व पारंपारिक वाद्य वाचवत शिस्तबद्धेत अनेक पालख्या श्रीक्षेत्र मढी येथे दाखल होतात. यावर्षी पावसाने दडी मारल्याने पाणी टंचाईचे सावट असुन बाहेरगावच्या मंडळांना विकत पाणी घेण्याची वेळ आली आहे.तालुक्यातील श्रावणातील सर्वात मोठी यात्रा मढीच्या पालखी सोहळ्याकडे बघीतले जाते.

# पाझर तलाव भरण्याच्या मार्गातील अडथळे दूर करा : काकडे

## अन्यथा १ सप्टेंबर रोजी आंदोलन

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**शेवगाव :** जायकवाडी धरणात शेवगाव तालुक्यातील २९ गावे गेली. या बदल्यात दुष्काळी भागाला पाणी मिळण्यासाठी मंजूर करण्यात आलेल्या ताजनापूर लिफ्ट सिंचन योजना टप्पा क्र. ०२ मधील सोनेसांगवी व वरखेड येथील पाझर तलाव आणि बंधारे तात्काळ भरण्यासाठी शेतकऱ्यांनी स्वखर्चाने खोदलेल्या चरात जाणीवपूर्वक अडथळे निर्माण केले जात असुन प्रशासनाने दखल घेऊन बंधारे भरण्यासाठीच्या पाण्याचा प्रवाह सुरळीत करावा, अन्यथा १ सप्टेंबर २०२६ पासून येथील ताजनापूर उपविभागीय कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशारा ॲड. शिवाजीराव काकडे आणि सौ. हर्षदाताई काकडे यांनी दिला आहे.

ताजनापूर लिफ्टचे पाणी वरखेड-सोनेसांगवी शिवारातील बंधाऱ्यात पोहोचवण्यासाठी स्थानिक शेतकऱ्यांनी स्वखर्चाने चर खोदून दगड व मुरुमाचा भराव करत पाण्याचा मार्ग तयार केला आहे. मात्र, काही घटकांकडून पाण्याच्या प्रवाहात जाणीवपूर्वक अडथळे निर्माण केले जात असून चरातून जाणारे पाणी मध्येच फोडून वळवले जात आहे. परिणामी हक्काचे पाणी मिळत नसल्याने या भागातील शेतकरी पाण्यापासून वंचित राहत आहेत. सध्या पावसाने ओढ दिल्याने परिसरातील पिके सुकू लागली असून शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तसेच जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा व चाऱ्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. याप्रकरणी सोनेसांगवी ग्रामपंचायतीने देखील विशेष ठराव संमत केलेला असुन त्याची प्रत निवेदनासोबत जोडण्यात आली आहे.

निवेदनाच्याप्रतीजिल्हाधिकारी, ताजनापूर मध्यम प्रकल्प विभागाचे कार्यकारी अभियंता आणि शेवगाव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांनाही पाठवण्यात आल्या असुन प्रशासनाने या प्रकरणाची तातडीने गांभीर्याने दखल घेऊन बंधाऱ्यात पाणी सोडण्याचा मार्ग मुक्त करावा; अन्यथा १ सप्टेंबर २०२६ रोजी होणाऱ्या आंदोलनातून उद्भवणाऱ्या परिस्थितीस प्रशासनच पूर्णपणे जबाबदार राहील, असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

निवेदनावर सरपंच रामकिसन मडके, अरुण आंधळे, प्रवीण आंधळे, शरद आंधळे, लक्ष्मण मडके, मनोहर सांगळे, सुजित माळी, रामकिसन पातकळ, रामजी मडके, अनिल आंधळे, संजय तिडके, रविकिरण बडे, पप्पू पठाण, महादेव आंधळे, रेवन्नाथ शिरसाठ, बन्सी तेलोरे, रामकिसन तेलोरे, संतोष गाढे, अब्बास पठाण, यांच्यासह शेकडो शेतकरी व ग्रामस्थांच्या सह्या आहेत.

## कोल्हापूर मिश्र खत कारखान्यात दुसरे उत्पादन सत्र सुरू

**पुणे :** महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाच्या कोल्हापूर येथील मिश्र खत कारखान्यातील दुसऱ्या उत्पादन सत्राचा शुभारंभ कृषिमंत्री तथा महामंडळाचे अध्यक्ष दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते ऑनलाइन पद्धतीने करण्यात आला. या कार्यक्रमास कृषी राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, कृषी विभागाचे वरिष्ठ अधिकारी, म हामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक अशोक काकडे, विभागीय व्यवस्थापक, कारखाना व्यवस्थापक तसेच मुख्य कार्यालयातील संबंधित अधिकारी ऑनलाइन उपस्थित होते.मिश्र खताचे उत्पादन वाढल्याने आगामी खरीप तसेच रब्बी हंगामात शेतकऱ्यांना आवश्यकतेनुसार खताचा पुरवठा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. कृषी उद्योगाच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या गरजा पूर्ण करण्याला अधिक चालना मिळेल, असा विश्वास कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी व्यक्त केला.महामंडळाच्या कोल्हापूर येथील मिश्र खत कारखान्यात उत्पादित होणाऱ्या मिश्र खताचा पुरवठा कोल्हापूर, सांगली, सिंधुदुर्ग, रत्नागिरी तसेच धाराशिव आणि पुणे जिल्ह्यांमध्ये केला जातो. दुसरे उत्पादन सत्र सुरू झाल्याने दररोज सुमारे ४० मेट्रिक टन अतिरिक्त मिश्र खताचे उत्पादन होणार आहे. त्यामुळे कारखान्याच्या मंजूर वार्षिक उत्पादन क्षमतेनुसार उत्पादन घेणे शक्य होणार असून, वाढीव उत्पादनाचा लाभ आगामी खरीप व रब्बी हंगामात शेतकऱ्यांना मिळणार आहे.

## आळंदीत नो-पार्किंग फलकाविना दुचाकी उचलल्याचा आरोप

**आळंदी :** आळंदी शहरातील प्रदक्षिणा मार्ग, भाजी मंडई व मरकळ रस्त्यावर 'नो पार्किंग'चे फलक नसतानाही दुचाकी वाहने उचलून ७०० रुपये दंड वसूल केला जात असल्याचा आरोप रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) व्यापारी आघाडीने केला आहे.

वाहन उचलण्यापूर्वी सूचना दिली जात नाही, कारवाईचे छायाचित्रण केले जात नाही तसेच टोईंग कर्मचारी गणवेशात नसतात, असा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे. वाहन नेल्यानंतर त्याचे ठिकाणही वाहनधारकांना सांगितले जात नसल्याचे संघटनेने म्हटले आहे.या प्रकाराची चौकशी करून कारवाई थांबवावी, अशी मागणी रिपाइं व्यापारी आघाडीचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष नियती विकास शिंदे यांनी केली आहे. मागण्यांची दखल न घेतल्यास ९ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता आळंदी पोलीस ठाण्यासमोर आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. निवेदनाच्या प्रती संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

## हुतात्मा राजगुरू जयंतीनिमित्त २०० देशी वृक्षांची लागवड



**आळंदी :** हुतात्मा शिवराम हरी राजगुरू जयंती तसेच 'रानमळा पॅटर्न'चे प्रणेते निसर्गवासी पी. टी. शिंदे गुरुजी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ पर्यावरण जागर प्रतिष्ठान, हुतात्मा शिवराम हरी राजगुरू पत्रकार संघ, खेड तालुका व नेचर फाउंडेशन, आळंदी देवाची यांच्या संयुक्त विद्यमाने माजगाव, चिंबळी येथे वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी दोनशे देशी वृक्षप्रजातींची लागवड करण्यात आली.

कार्यक्रमास वनपरिक्षेत्र अधिकारी संतोष कंक, विलास कातोरे, मिलिंद शिंदे, श्रीकांत बोरावके, हनुमंत देवकर, भागवत काटकर, अनिल जोगदंड यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

वृक्षांचे मानवी जीवनातील महत्त्व अधोरेखित करताना हनुमंत देवकर यांनी कोरोना काळातील ऑक्सिजनच्या टंचाईची आठवण करून दिली. वृक्षारोपण हा केवळ एक दिवसाचा उपक्रम न राहता सातत्याने वृक्षसंवर्धन झाले पाहिजे, असे त्यांनी सांगितले.मिलिंद शिंदे यांनी आगामी काळात 'एक विद्यार्थी, एक झाड' हा उपक्रम राबविण्याची माहिती दिली. तर भागवत काटकर यांनी वृक्षलागवड व संवर्धनासाठी ठोस धोरणाची गरज व्यक्त केली. उपस्थित म ान्यवरांनी वृक्षसंवर्धनाचा संकल्प केला.

# विद्यार्थ्यांच्या प्रश्नांचा पाठपुरावा करणार : डॉ. गोऱ्हे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** विद्यार्थ्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे काही प्रश्न मार्गी लागले असून, उर्वरित प्रश्नांचा एमपीएससी, विद्यापीठ प्रशासन आणि संबंधित विभागांकडे ठोस पाठपुरावा करणार असल्याची ग्वाही शिवसेना नेत्या तथा विधान परिषद सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिली.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील बॅ. जयकर ग्रंथालय येथे 'युवांचा आवाज, शिवसेना लोकप्रतिनिधींसोबत संवाद' उपक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी विद्यार्थी, स्पर्धा परीक्षार्थी आणि संशोधकांशी त्यांनी संवाद साधला.

एमपीएससीने परीक्षांचे निश्चित वेळापत्रक आगाऊ जाहीर करावे, एकाच दिवशी अनेक परीक्षा घेऊ नयेत आणि निकाल वेळेत जाहीर करावेत, अशी मागणी विद्यार्थ्यांनी केली. पेपरफुटीची माहिती देणाऱ्यांची ओळख गोपनीय ठेवण्यासाठी स्वतंत्र हेल्पलाइन सुरू करावी, अशी सूचना डॉ. गोऱ्हे यांनी केली. विद्यापीठातील मेस व कॅन्टीनम धील अन्नाची गुणवत्ता व स्वच्छतेसाठी विद्यार्थी प्रतिनिधींचा व्यवस्थापन समितीत समावेश करावा, असे त्यांनी सांगितले. जर्मनी रोजगार उपक्रमासाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे रखडलेले जर्मन भाषा प्रशिक्षण सुरू करण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कुलगुरूंची भेट घेणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

लघुलेखक भरती, एमपीएससीची पदपसंती व प्रतीक्षा यादी, पीएसआयच्या जागा, प्राध्यापक भरती, शिष्यवृत्ती व डीबीटीतील विलंब तसेच पॅरामेडिकल भरतीच्या प्रश्नांचाही पाठपुरावा करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

दरम्यान, २०२५ मधील सदाशिव पेठेतील अपघातानंतर जखमी विद्यार्थ्यांना डॉ. गोऱ्हे यांनी केलेल्या आर्थिक मदतीची आठवण करून एका विद्यार्थ्याने अशी मदत केवळ आईच करू शकते, अशा शब्दांत त्यांचे आभार मानले.



पुणे येथे विद्यार्थ्यांशी संवाद साधताना विधान परिषद सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे.

## शिरूरच्या ४२ गावांचा भीमाशंकर कारखान्याच्या कार्यक्षेत्रात समावेशाची मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कवठे येमाई :** शिरूर तालुक्यातील आंबेगाव विधानसभा मतदारसंघाशी जोडलेल्या ४२ गावांतील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना भीम ाशंकर सहकारी साखर कारखान्याचे अधिकृत सभासदत्व देऊन या गावांचा कारखान्याच्या कार्यक्षेत्रात समावेश करावा, अशी मागणी शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने केली आहे.

शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने कारखान्याचे अध्यक्ष बाळासाहेब बेंडे, उपाध्यक्ष प्रदीप वळसे पाटील आणि संचालक मंडळाची भेट घेऊन निवेदन दिले. ४२ गावांतील शेतकऱ्यांनी कारखान्याचे शेअर्स खरेदी करून अनेक वर्षे ऊस पुरवठा केला आहे. मात्र, अद्याप त्यांना अधिकृत सभासदत्व मिळाले नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे. त्यामुळे सभासदत्वाचा प्रश्न मार्गी लावावा, तसेच ४२ गावांचा कार्यक्षेत्रात समावेश करावा, अशी मागणी करण्यात आली.

या मागणीबाबत कारखान्याचे उपाध्यक्ष प्रदीप वळसे पाटील यांनी सांगितले की, भीमाशंकर कारखान्याच्या कार्यक्षेत्रात आंबेगाव तालुक्यातील १०३ गावे आधीच आहेत. शिरूर तालुक्यातील आणखी ४२ गावे कार्यक्षेत्रात समाविष्ट करण्याचा निर्णय कारखाना व्यवस्थापनाच्या अधिकारात नसून याबाबत साखर आयुक्तांचा निर्णय अंतिम आहे. त्यामुळे संबंधित शेतकऱ्यांनी साखर आयुक्तांकडे मागणीचा प्रस्ताव सादर करावा.

सभासदत्व तसेच ४२ गावांचा कार्यक्षेत्रात समावेश हे दोन्ही विषय आगामी वार्षिक सर्वसाधारण सभेच्या विषयपत्रिकेवर घेण्यात यावेत, अशी मागणीही शिष्टमंडळाने केली आहे.

या शिष्टमंडळात बाळासाहेब पठारे, माउली ढोमे, अविनाश पोकळे, नितीन थोरात, म्हातारबा शेलार, रवी म्हस्के, शशांक गीते, दत्ता दुडे, आबा वागदरे, बाळासाहेब सालकर, विकास वरे, रमेश वरे आणि नरेश ढोमे यांच्यासह ४२ गावांतील ऊस उत्पादक शेतकरी सहभागी झाले होते.



भीमाशंकर साखर कारखान्याच्या पदाधिकाऱ्यांना निवेदन देताना शिरूर तालुक्यातील ४२ गावांतील ऊस उत्पादक शेतकरी.



आदर्श उद्योजिका पुरस्कार स्वीकारताना संजीवनी विनायक गायकवाड.

## संजीवनी गायकवाड यांचा आदर्श उद्योजिका पुरस्काराने सन्मान

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**माळशिरस :** आंबळे (ता. पुरंदर) येथील माजी ग्रामपंचायत सदस्या आणि संजीवनी गृह उद्योगाच्या संस्थापिका संजीवनी विनायक गायकवाड यांचा सासवड येथे आदर्श उद्योजिका पुरस्काराने सन्मान करण्यात आला.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, तालुका कक्ष पुरंदर आणि कऱ्हामाई प्रभाग संघ यांच्या वतीने हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. संजीवनी गृह उद्योगाच्या माध्यमातून विविध घरगुती पदार्थ तयार करून त्यांची बाजारपेठ वाढविण्यात गायकवाड यांचे योगदान आहे. यापूर्वी त्यांना दैनिक प्रभातचा 'सुपर वुमन' पुरस्कारही मिळाला आहे.

या यशाबद्दल विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन होत आहे. पुरस्कार वितरण कार्यक्रमास पुरंदर पंचायत समितीचे सभापती अमित झेंडे, दिवे-दराडे जिल्हा परिषद गटाच्या सदस्या रूपाली झेंडे, माजी जिल्हा परिषद सदस्या ज्योती झेंडे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख वैशाली काळे, प्रभाग संघाच्या अध्यक्षा अलका बडदे यांच्यासह म हिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



खामगाव येथील ऊस उत्पादक शेतकरी सोपान बर्वे यांनी योग्य दर मिळत नसल्याने सुरू असलेली ऊसतोड बंद करून प्रतिटन ४७०० रुपये दर मिळेपर्यंत ऊस देणार नसल्याची भूमिका व्यक्त केली.

## खामगावमध्ये ऊसदरासाठी शेतकऱ्यांचा एल्गार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

खामगाव (ता. दौंड) येथे झालेल्या शेतकरी एल्गार मेळाव्यात ऊस उत्पादकांनी आक्रमक भूमि का घेत उसाला प्रतिटन ४७०० रुपये बाजारभाव मिळाल्याशिवाय ऊसतोड न करण्याचा निर्धार केला. साखर व गुळाच्या बाजारभावात वाढ होत असताना ऊस उत्पादकांना कमी दर का, असा सवाल शेतकऱ्यांनी उपस्थित केला.

या मेळाव्यास परिसरातील सुमारे ५०० ते ६०० तरुण व ज्येष्ठ ऊस उत्पादक शेतकरी उपस्थित होते. वाढता उत्पादन खर्च, महागाई आणि शेतीसाठी लागणाऱ्या वाढत्या खर्चाच्या तुलनेत सध्याचा ऊसदर परवडत नसल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.साखर आणि गुळाच्या दरात तेजी असेल, तर त्याच प्रमाणात उसाच्या दरातही वाढ झाली पाहिजे, अशी भूमिका शेतकऱ्यांनी मांडली. मेळाव्यात हात वर करून ४७०० रुपये प्रतिटन दराचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला. हा दर मिळेपर्यंत ऊस कारखान्यांना देणार नसल्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. मेळाव्यात अनेक ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आपली भूमिका मांडली. ऊसदराचा प्रश्न मार्गी न लागल्यास ऊसतोड बंद ठेवण्याचा इशाराही देण्यात आला.

## आईच्या स्मरणार्थ ७१ आंबा रोपांचे वाटप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**दौंड :** नाथाचीवाडी ग्रामपंचायतीचे उपसरपंच रामदास कांबळे यांनी आईच्या संस्कारांचा वारसा जपत पर्यावरण संवर्धनाचा आदर्श समाजासमोर ठेवला आहे. आईच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त त्यांच्या कुटुंबीयांनी ७१ आंबा रोपांचे वाटप करून आईची स्मृती जपण्यासोबतच पर्यावरण रक्षणाचा संदेश दिला.

नाथाचीवाडी येथील स्व. लोचना नामदेव कांबळे यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त हा उपक्रम राबविण्यात आला. आईच्या आठवणी कायम राहाव्यात, गावासमोर पर्यावरण संवर्धनाचा आदर्श निर्माण व्हावा, या उद्देशाने कांबळे कुटुंबाने हा संकल्प केला. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते आंबा रोपांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाचे ग्राम स्थांकडून कौतुक करण्यात आले. यावेळी सभापती सुखदेव चोरमले, संजय इनामके, विलास धेंडे, ग्रामविकास अधिकारी भाऊसाहेब आवाळे, विठ्ठल थोरात, गोविंद शेंडगे, धर्मशील झाडगे, संदीप गडदे, रामदास झाडगे, शहाजी ठोंबरे, गजानन वळकुंडे, योगेश हाके, पंडित बर्वे, एकनाथ ढवळे, प्रवीण शितोळे, आदिनाथ राऊत, सुभाण झाडगे, संभाजी पंडित, ह.भ.प. माऊली महाराज तनपुरे यांच्यासह रोहिदास नगर तरुण मंडळ, नाथाचीवाडी भजनी मंडळाचे पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.



आईच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त ७१ आंबा रोपांचे वाटप करताना कांबळे कुटुंबीय व उपस्थित मान्यवर.

# कातोबानाथ महाराजांच्या पालखी सोहळ्यात गुलालाची उधळण



वनभोजनानिमित्त कातोबानाथ महाराजांच्या पालखी सोहळ्यात ग्रामस्थांनी गुलालाची उधळण केली. इन्सेटमध्ये कातोबानाथ महाराज मंदिरातील सजावट.

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**दिवे :** दिवे ग्रामस्थांनी शेकडो वर्षांची परंपरा जपत यंदाही वनभोजनाचा उत्सव भक्तिमय वातावरणात उत्साहात साजरा केला. पहाटे ग्रामदैवत कातोबानाथ महाराज मंदिरात पुजारी स्वप्निल दिवेकर, दिगंबर दिवेकर आणि विजय दिवेकर यांच्या हस्ते महापूजा करण्यात आली. त्यानंतर मंदिर भाविकांसाठी खुले करण्यात आले. दिवसभर दर्शनासाठी ग्रामस्थ व भाविकांची मोठी गर्दी झाली होती.

दुपारी दोन वाजता कातोबानाथ महाराजांच्या पालखीने माळावर जाण्यासाठी प्रस्थान केले. ढोलाच्या ठेक्यावर ग्रामस्थांनी गुलालाची उधळण करत गजनृत्य सादर केले. यंदाच्या पालखीचा मान समस्त झेंडे मंडळ बारवके भावकीकडे होता. महिलांनी पालखीच्या खांदेकऱ्यांना मानाचे हेल घालण्यासाठी गर्दी केली होती. लहान मुलांचा ओलांडा झाल्यानंतर टिळेकर आळीमार्गे पालखी माळावर पोहोचली. मार्गावर महिलांनी रांगोळ्या काढून पालखीचे स्वागत केले.

माळावर परिसरातील बारा वाड्यांम धील भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली. वनभोजनानिमित्त युवकांसाठी कबड्डी सामन्याचे आयोजन करण्यात आले. अ आणि ब संघातील सामन्यात ब संघाने विजय मिळविला. पालखीसम ोर ह.भ.प. गितांजली महाराज झेंडे-कुलकर्णी यांचे कीर्तन झाले. गावातील भजनी मंडळाने साथ दिली. ग्रामस्थांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

बालगोपाळांनी पतंग उडविण्याचा आनंद घेतला. काही मुलांनी स्वतः तयार केलेल्या आकर्षक वावड्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधले. संध्याकाळी पालखीची जालिंदरनाथ महाराज मंदिरात भेट झाली. त्यानंतर पालखी गावच्या वेशीवर विसावली. रात्री वाजतगाजत पालखी पुन्हा कातोबानाथ महाराज मंदिरात पोहोचल्यानंतर उत्सवाची सांगता झाली. वनभोजनाला दिवे गावात धार्मिक व सामाजिक महत्त्व असून, नोकरी-व्यवसायानिमित्त बाहेरगावी असलेले ग्रामस्थही या पारंपरिक उत्सवासाठी आवर्जून गावात येतात. यावेळी ग्रामस्थांसह पाहुणे मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती.

## पत्रकार मंदार गोंजारी यांच्यावरील गुन्ह्याचा निषेध

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग पुणे (उजएझ) येथील विद्यार्थ्यांच्या समस्या मांडल्याप्रकरणी अइझ माझा वृत्तवाहिनीचे पत्रकार मंदार गोंजारी यांच्यावर ट्रेसपासचा गुन्हा दाखल करण्यात आल्याचा आरोप संभाजी ब्रिगेडने केला आहे. या कारवाईचा संभाजी ब्रिगेडने जाहीर निषेध केला आहे.

पत्रकाराचे प्रमुख कर्तव्य सत्य जनतेसमोर आणणे आणि नागरिकांच्या समस्या मांडणे हे आहे. पत्रकारांवर गुन्हे दाखल करून त्यांचा आवाज दडपण्याऐवजी शासनाने आपला कारभार सुधारून नागरिकांना चांगल्या सुविधा द्याव्यात, अशी भूमिका संभाजी ब्रिगेडचे प्रदेश प्रवक्ता ॲड. संतोष शिंदे यांनी मांडली.

अन्यायाविरोधात बोलणे आणि नागरिकांच्या प्रश्नांना वाचा फोडणे हा लोकशाहीतील नैतिक अधिकार आहे. पत्रकार मंदार गोंजारी यांच्या पाठीशी संभाजी ब्रिगेड ठामपणे उभी आहे. पत्रकारांवरील कारवाईमुळे लोकशाहीच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याबाबत प्रश्न निर्माण होत असल्याचेही शिंदे यांनी नमूद केले.मुख्यमंत्री महोदय, लोकशाही संपली का? असा सवाल ॲड. संतोष शिंदे यांनी केला.

## पिंपळवंडीतील बालिका हत्याप्रकरणी आरोपीवर कठोर कारवाई करणार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पिंपळवंडी :** जुन्नर तालुक्यातील पिंपळवंडी येथे साडेनऊ वर्षांच्या बालिकेवर अत्याचार करून हत्या केल्याच्या घटनेनंतर उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी पीडित कुटुंबाची भेट घेऊन सांत्वन केले. शासन कुटुंबाच्या पाठीशी असून आरोपीवर कठोरात कठोर कारवाई केली जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

यावेळी पुणे जिल्हा पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल यांच्याकडून उपमुख्यमंत्र्यांनी तपासाची माहिती घेतली. तपासात कोणतीही त्रुटी राहू नये, वेगाने तपास पूर्ण करून लवकर आरोपपत्र दाखल करावे, अशा सूचना त्यांनी दिल्या. तसेच आरोपीला कठोर शिक्षा मिळावी यासाठी खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. पीडित कुटुंबाच्या पुनर्वसनासाठी शबरी घरकुल योजनेतून तातडीने घर उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करण्याचे निर्दे श देण्यात आले. तसेच महिला व बालकांच्या सुरक्षिततेसाठी मोक्याच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे आणि हायमास्क दिवे बसविण्याच्या सूचना देण्यात आल्या. पिंपळवंडी परिसरातील नागरिकांना जातीचे दाखले उपलब्ध करून देण्यासाठी विशेष शिबिर घेण्यात येणार आहे. दरम्यान, राष्ट्रवादी वेल्फेअर फंडातून पाच लाख रुपये मदत जाहीर करण्यात आली असून, महिला व बालविकास विभागाच्या मनोधैर्य योजनेतून दहा लाख रुपयांची मदत देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. ही रक्कम पीडित कुटुंबाच्या खात्यावर जमा करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.



## कवठे येमाईत श्रीकृष्ण जन्मोत्सव सोहळा



**कवठे येमाई :** भगवान श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त कवठे येमाई येथे श्री गोपाळ कृष्ण देवस्थान ट्रस्ट व ग्राम स्थांच्या वतीने श्रीकृष्ण जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.शुक्रवारी, ४ सप्टेंबर रोजी रात्री १० ते १२ या वेळेत श्रीकृष्ण जन्म कीर्तन होणार आहे. यावेळी चिंतनकेसरी ह.भ.प. भरत महाराज थोरात (वडगाव पाटोळे, राजगुरुनगर) यांचे कीर्तन होणार असून, कीर्तनसाथ ह.भ.प. प्रकाश महाराज गुंजाळ यांची लाभणार आहे. शनिवारी, ५ सप्टेंबर रोजी सकाळी ९ ते १२ या वेळेत काल्याचे कीर्तन होणार असून, त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमास माजी सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील तसेच शिरूरचे माजी आमदार पोपटराव गावडे उपस्थित राहणार आहेत.


## PUBLIC NOTICE

Notice is hereby given to all the public that my client has agreed to purchase all the piece and parcel of Flat No. 07, situated at second floor in Building A-2 Sector No. G and society known as "Shri Ramkrishna Vihar Co-Op Housing Society Ltd." carpet area admeasuring about 1200 sq. ft. situated at S. No. 24A of the village Nigadi, Tal. Haveli, Dist. Pune 411044 (Hereinafter referred as "The said Property") within the limits of PCMC from its registered owner Pawan Vishwanath Choubey. The said owner have received the earnest amount from my client and the above owner has further assured that he is absolute and only owner holding all the rights, titles and interests, possession in the said property and it is free from all encumbrances of whatsoever nature. However if any person/s is having any claim/s in the respect of "The said property" or any part thereof by charge, lease, lien, inheritance, gift, trust, maintenance, possession, easement, or otherwise, howsoever are requested to make the same known to the undersigned at the address mentioned below, along with the necessary document within 10 (Ten) days from the date of publication of this public notice, failing which, my client shall complete the transaction and claim/s and right/s if any, of any person/s not lodged within the said stipulated period shall be considered as willfully abandoned, waived and given away by said person/s.

**Place PUNE.**
**Date-24/08/2026.**

**Mrs. Sarika Santosh Vidhate - Waghole**
Advocate and Notary
Office: IT 59 Food Court, Opp. Sub Registrar Office,
Mulshi 2, Hinjewadi, Pune-411057.Mobile-9970428946.

## जाहीर आवाहन

सर्व लोकांना कळवण्यात येते की, स्नेहा गतिश्वर माळवदकर, राहणार S.No.67/1, गणेश पार्क सहकारी हौसिंग सोसायटी, हॉटेल गोविंद गार्डन समोर, पिंपळे सौदागर, पुणे - ४११०२७. यांचे २१.०९.२०२५ रोजी निधन झाले असून, त्यांच्या नावावर असणारे दुचाकी वाहन MH-14-GG- 4011 असे असून त्याचा इंजिन नंबर BG4AH1923772, चासीस नंबर MD626BG46H1A30875 असा असून सदर दुचाकी वाहन त्यांचे कायदेशीर वारसदार गतिश्वर मोहन माळवदकर यांच्या नावावर करण्यात येणार असून, याबाबत कोणाची काही तक्रार असल्यास, आठ दिवसांच्या आत पिंपरी चिंचवड आरटीओ कार्यालयात कळवावे. अन्यथा कोणाची काही तक्रार नाही असे समजून, पुढील पूर्तता करण्यात येईल. याची नोंद घ्यावी .

**दिनांक - २८/०८/२०२६**

**गतिश्वर मोहन माळवदकर**
S. No.67/1, गणेश पार्क सहकारी हौसिंग सोसायटी, हॉटेल गोविंद गार्डन समोर, पिंपळे सौदागर, पुणे - ४११०२७.

## जाहीर आवाहन

सर्व लोकांना कळवण्यात येते की, किरण बाळासाहेब पैलवान, राहणार फ्लॅट नंबर ५०५, S. No.152/2, अ-२ विंग, शामा इस्टेट, चह्रोली फाटा, चोविसावाडी, पुणे - ४१२१०५. यांचे १७.१०.२०२५ रोजी निधन झाले असून, त्यांच्या नावावर असणारे चारचाकी वाहन MH-14-JM-1691 असे असून त्याचा इंजिन नंबर G12BN918138, चासीस नंबर MA3ERLF1S00906176 असा असून सदर चार चाकी वाहन त्यांचे कायदेशीर वारसदार पत्नी श्रीमती सुरेखा किरण पैलवान यांच्या नावावर करण्यात येणार असून, याबाबत कोणाची काही तक्रार असल्यास, आठ दिवसाच्या आत पिंपरी चिंचवड आरटीओ कार्यालयात कळवावे. अन्यथा कोणाची काही तक्रार नाही असे समजून, पुढील पूर्तता करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दिनांक - २८/०८/२०२६

**श्रीमती सुरेखा किरण पैलवान**
फ्लॅट नंबर ५०५, S. No.152/2, अ-२ विंग, शामा इस्टेट, चह्रोली फाटा, चोविसावाडी, पुणे - ४१२१०५.

# पारनेर शहरातील मुख्य रस्त्यासाठी नागरिकांचा पुढाकार

## नगराध्यक्षा कावरे यांनी स्वतःच्या हॉस्पिटलसमोरील अतिक्रमण काढले

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**निघोज :** पारनेर शहरातील मुख्य रस्ता २२ मीटर रुंदीचा करण्यासाठी शहरातील नागरिकांनी आता स्वतःहून पुढाकार घेतला आहे. या उपक्रमाची सुरुवात नगराध्यक्षा विद्या कावरे यांनी केली असून, त्यांनी आपल्या हॉस्पिटलसमोरील पायऱ्या जेसीबीच्या साहाय्याने स्वतः हून काढून रस्ता रुंदीकरणासाठी आवश्यक जागा मोकळी करून दिली. त्यांच्या या पुढाकाराचे शहरवासीयांकडून स्वागत होत असून, इतर नागरिक व व्यावसायिकांनीही रस्त्याच्या रुंदीकरणासाठी अडथळे दूर करण्याची तयारी दर्शविली आहे. खडकी-खंडाळा ते देवीभोवरे फाटा या राज्य महामार्गाचे काम सध्या सुरू आहे. पारनेर शहराच्या हद्दीतून जाणारा हा रस्ता भविष्यातील वाहतूक आणि शहराचा वाढता विस्तार लक्षात घेऊन २२ मीटर रुंदीचा करण्यात यावा, अशी मागणी शहरातील नागरिकांनी केली होती. या मागणीला सकारात्मक प्रतिसाद मिळत असताना आता शहरातील व्यापारी, नागरिक आणि संबंधित ठेकेदार यांनी एकत्रितपणे रस्त्याच्या कामासाठी आवश्यक जागा मोकळी करण्यास सुरुवात केली आहे.




पारनेर शहराची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत असून, वाहनांची संख्याही मोठ्या प्रमाणात वाढली आहे. शहरातील मुख्य बाजारपेठ, कृषी उत्पन्न बाजार समिती, महाविद्यालय परिसर तसेच विविध शासकीय व खासगी आस्थापनांमुळे दिवसभर मोठ्या प्रमाणावर वाहतूक असते. अरुंद रस्त्यामुळे अनेक वेळा वाहतूक कोंडी निर्माण होते. त्याचबरोबर रस्त्यावर होणारी गर्दी आणि अपुऱ्या जागेमुळे अपघाताचा धोकाही वाढला आहे. त्यामुळे भविष्यातील गरजा लक्षात घेऊन रस्त्याचे नियोजन आताच २२ मीटर रुंदीने करणे आवश्यक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

नगराध्यक्षा विद्या कावरे यांनी स्वतःच्या मालकीच्या बांधकामातील पायऱ्या हटवून रस्ता रुंदीकरणाला प्रत्यक्ष कृतीतून सुरुवात केली. शहराचा विकास हा सर्वांचा विषय असून, त्यासाठी प्रत्येकाने काही ना काही त्याग करणे गरजेचे आहे, या भावनेतून त्यांनी घेतलेला निर्णय इतरांसाठीही आदर्श ठरत आहे.

दरम्यान, कन्हेर ओव्हळ ते पुणेवाडी फाटा हा रस्ताही २२ मीटर रुंदीचा करण्यात यावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. पारनेर शहराचा भविष्यात होणारा विस्तार, वाढणारी लोकसंख्या आणि वाहनांची वाढती संख्या लक्षात घेता शहरातील प्रमुख रस्त्यांचे नियोजन दीर्घकालीन दृष्टीने करण्याची गरज असल्याचे नागरिकांनी सांगितले.

> शहराच्या विकासासाठी तसेच अरुंद रस्त्यामुळे होणारी वाहतूक कोंडी,भविष्यात वाढणारी अपघातांची संख्या टाळण्यासाठी पारनेर शहरातून जाणारा रस्ता २२ मीटर रुंदीचा असावा अशी पारनेरकरांची आग्रही मागणी आहे.या मागणीसाठी आपणासह सर्व सहकारी नगरसेवक, विविध संस्थांचे पदाधिकारी, ग्रामस्थ सातत्याने पाठपुरावा करीत आहेत. या मागणीला बळ देण्यासाठी आपण अडथळा दूर करण्यासाठी सर्वात प्रथम पुढाकार घेतला.इतर व्यावसायिक,नागरिक निश्चितच सहकार्य करतील.
>
> **डॉ.विद्या कावरे, नगराध्यक्षा, पारनेर**

# जामखेड शहर व तालुक्यात दुष्काळसदृश्य परिस्थिती

## पाणीटंचाईवर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**जामखेड :** जामखेड शहर व तालुक्यात सध्या दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली असून प्रमुख तलाव, बंधारे व पाण्याचे स्रोत झपाट्याने कोरडे पडत आहेत. त्यामुळे आगामी काळात पिण्याच्या पाण्याची गंभीर टंचाई निर्माण होण्याची शक्यता असून प्रशासनाने आतापासूनच ठोस नियोजन करावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी - शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने करण्यात आली.

जामखेड शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या भुतवडा तलावातील पाणीसाठा येत्या काही दिवसांत संपण्याची शक्यता असल्याने शहराच्या पर्यायी पाणीपुरवठ्याचे तातडीने नियोजन करावे, अशी मागणी करण्यात आली. त्याचबरोबर तालुक्यातील ग्रामीण भागातील वाड्या-वस्त्यांमध्येही पाणीटंचाई निर्माण होण्यापूर्वी आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली.

याबाबत गुरुवार, दि. २७ ऑगस्ट रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी - शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने तहसील कार्यालयात निवेदन देण्यात आले. निवासी नायब तहसीलदार मच्छिंद्र पाडळे यांना देण्यात आले. प्रशासनाने जामखेड शहर व तालुक्यासाठी पाणीटंचाई निवारण आराखडा तयार केला आहे काय, याची माहिती जनतेसमोर जाहीर करावी, अशी मागणी करण्यात आली. आराखडा सार्वजनिक केल्यास त्यामध्ये आवश्यक सुधारणा किंवा अतिरिक्त उपाययोजनांबाबत नागरिक व लोकप्रतिनिधींना सूचना करता येतील, असेही निवेदनात नमूद करण्यात आले. शहरासाठी पर्यायी पाणीपुरवठ्याबरोबरच ग्रामीण भागासाठी गावनिहाय टंचाई आराखडा तयार करून आवश्यक ठिकाणी टँकर, विहीर अधिग्रहण, नवीन विंधन विहिरी, पाईपलाईन आदींचे प्रस्ताव तातडीने जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठवावेत, अशी मागणी करण्यात आली.

यावेळी तालुकाध्यक्ष विजयसिंह गोलेकर यांनी प्रशासनाने टंचाई निर्माण झाल्यानंतर धावपळ करण्याऐवजी आतापासूनच नियोजन करण्याची गरज व्यक्त केली. मागील टंचाईच्या काळात आमदार रोहित पवार यांच्या माध्यमातून प्रशासनाची वाट न पाहता वाड्या-वस्त्यांवर पाण्याचे टँकर उपलब्ध करून दिले जात होते. यावेळी विजयसिंह गोलेकर, मंगेश आजबे, शरद शिंदे, सुरेश भोसले, सुनील कोठारी, नगरसेवक वसीम सय्यद, माजीद कुरेशी, प्रशांत राळेभात, रामहरी गोपाळघरे, बापुसाहेब कार्ले, अभय शिंगवी, सुनील उगले, बाळासाहेब खैरे, अनिल रेडे, कुंडल राळेभात, सुदाम गव्हाणे, महादेव डिसले, शिवाजी डोंगरे, बाबासाहेब मगर, बजरंग डुचे, अनिल बाबर, सचिन शिंदे, पोपट कार्ले, हरीभाऊ आजबे, रामभाऊ बाबर, वसीम शेख, दत्ता डिसले, उगले सर आदी उपस्थित होते.

## द•ख•ल

### खंडोबा पाऊतके परिसरात दोन बिबट्यांचा संचार

**निघोज :** जगप्रसिद्ध रांजणखळगे रस्त्यावर असलेल्या खंडोबा पाऊतके परिसरात गेली चार दिवसांपासून दोन बिबटे रात्री अपरात्री फिरत असून या बिबट्याची परिसरातील खंडोबा पाऊतके परिसरातील वस्तीवरील लोकांनी दहशत घेतली असून बिबट्यांचा बंदोबस्त करण्यासाठी या भागात पिंजरे उपलब्ध करून द्यावेत अशी मागणी खंडोबा पाऊतके परिसर ग्रामस्थ, मुलिका गणेश मंडळ तसेच ग्रामस्थांनी केली आहे. याबाबत मंडळाचे ज्येष्ठ मार्गदर्शक रामदास लंके, कचरदास उनवणे, दिलीपराव वराळ, धोंडीभाऊ शेळके, विठ्ठलराव लंके, सुनिल उचाळे, राजेंद्र उचाळे, रामदास उचाळे, हरिओम वराळ, मंगेश लंके, अजय शेळके, सुरेश साळवे, पत्रकार रोहन उनवणे यांनी निवेदनाद्वारे वन विभागाचे अधिकारी यांच्याकडे मागणी केली आहे. या बाबत अधिक माहिती अशी आहे की गेली चार दिवसांपासून या परिसरात दोन बिबटे सायंकाळी ७ ते रात्री ११ पर्यंत फिरत असल्याचे या भागातील लोकांनी पाहीले आहे. बुधवारी रात्री साधारण ९.३० च्या सुमारास दैनिक राष्ट्रसह्याद्री पत्रकार रोहन उनवणे यांचा कुत्रा शेरु याच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला मात्र या कुत्र्याने पिंजऱ्याचा आधार घेतल्याने तो या हल्ल्यातून बचावला . खंडोबा पाऊतके परिसरातील शेतीमध्ये उस, कडवाळ अशी पिके मोठ्या प्रमाणात असल्याने या बिबट्यांना लपन क्षेत्राचा मोठ्या प्रमाणात आधार मिळत आहे तसेच शिरुर तालुक्यातील टाकळी हाजी, जांबूत हा परिसर पाच ते दहा किलोमीटर अंतरावर असल्याने कधी कुंड परिसर कधी खंडोबा पाऊतके परिसर तर कधी शिरुर तालुक्यात अशी ये जा हे बिबटे सातत्याने करीत आहेत. या बिबट्यांचा तातडीने बंदोबस्त करण्यासाठी या परिसरात दोन ठिकाणी पिंजऱ्याची व्यवस्था करावी अशी मागणी जनतेतून होत आहे.

### बाबुजी आव्हाड महाविद्यालयामध्ये रक्तदान शिबिर संपन्न



**पाथर्डी शहर :** पाथर्डी नगरपालिकेचे नगराध्यक्ष अभय आव्हाड यांच्या वाढदिवसानिमित्त उपजिल्हा रुग्णालय पाथर्डी व नित्यसेवा ब्लड सेंटर, श्रीरामपूर, राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना विभाग बाबूजी आव्हाड महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी डॉ. बबन चौरे, संदीप कांबळे, रवी भोईटे उपस्थित होते. या शिबिराचे आयोजन डॉ.अरुण राख, डॉ.आनंद घोंगडे, डॉ.वैशाली आहेर, कॅप्टन डॉ. अजयकुमार पालवे यांनी केले. डॉ अभिमन्यू ढोरमारे, प्रा. ब्रह्मानंद दराडे, डॉ. अर्जुन केळकर, नित्यसेवा ब्लड सेंटरचे वैभव गोरमाळी, सोहेल शेख, रवी भाईटे, संदीप कांबळे, मोनिका पारवे, संस्कृती आहीरे इत्यादींनी शिबिर यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.

### निघोज-कुंड रस्त्याच्या काँक्रिटीकरणासाठी आ. काशिनाथ दातेंना निवेदन



**पारनेर :** निघोज गावातून कुंड येथील प्रसिद्ध पर्यटनस्थळ व मळगंगा माता मंदिराकडे जाणारा रस्ता अत्यंत खराब झाल्याने या रस्त्याच्या काँक्रिटीकरणासाठी निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी समस्त ग्रामस्थ, ग्रुप ग्रामपंचायत व मळगंगा ग्रामविकास ट्रस्टच्या वतीने पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. निवेदनात म्हटले आहे की, निघोज गावाची लोकसंख्या सुमारे २० हजार असून कुंड हे जगप्रसिद्ध पर्यटनस्थळ आहे. कुंड येथे मळगंगा मातेचे मंदिर असल्याने दर्शनासाठी तसेच पर्यटनस्थळ पाहण्यासाठी महाराष्ट्राच्या विविध भागांतून दररोज मोठ्या संख्येने भाविक व पर्यटक येत असतात. मात्र, निघोज ते कुंड हा महत्त्वाचा मार्ग सध्या अत्यंत खराब अवस्थेत असल्याने भाविक, पर्यटक तसेच स्थानिक नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. यावेळी प्रशांत गायकवाड, प्रभाकर कवाद, ज्ञानदेव लंके, भाऊसाहेब लामखडे, वसंत ढवण, रोहिदास लामखडे, सोमनाथ वरखडे व रमेश वरखडे आदी ग्रामस्थांच्या वतीने निवेदन देण्यात आले.

# आठ दिवस होऊनही चोरीचा तपास शुन्य?

## निघोज ग्रामस्थ यांचा आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**निघोज :** जगप्रसिद्ध रांजणखळगे परिसरातील मळगंगा देवीच्या मंदिरातील दाणपेटी फोडून चोरट्यांनी ५४ हजार रुपयांची लूट केली आहे. ही चोरी होऊन आठ दिवस झाले असून अद्यापही कोनत्याही प्रकारे चोरट्यांचा मागमूस लावण्यात पारनेर पोलीसांना अपयश आले असून येत्या दि.३१ ऑगस्ट पर्यंत चोरीचा तपास न लागल्यास मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट व निघोज ग्रामस्थ आंदोलन करतील या आंदोलनाची सर्वस्वी जबाबदारी पारनेर पोलीसांची राहील असा इशारा मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे पदाधिकारी व विश्वस्त मंडळ तसेच ग्रामस्थांनी निवेदनाद्वारे दिला आहे. हे निवेदन पारनेरचे पो. नि. सोमनाथ दिवटे यांना वसंत कवाद, अमृता रसाळ, ठकाराम लंके, शांताराम कळसकर, मंगेश वराळ, रोहिदास लामखडे, अनिल शेटे, ॲड. ज्ञानेश्वर लामखडे, अनिल लंके यांनी दिले आहे.



निवेदनात पदाधिकारी व विश्वस्त मंडळ यांनी म्हटले आहे की जगप्रसिद्ध रांजणखळगे व मळगंगा तिर्थक्षेत्र यांचा नावलौकिक राज्यात आहे. या ठिकाणी दर्शनासाठी भावीक व जगप्रसिद्ध रांजणखळगे पाहण्यासाठी पर्यटक मोठ्या संख्येने येत असतात. या ठिकाणी मळगंगा देवीचे मंदिर असून राज्यातील लाखो भावीक या ठिकाणी दर्शनासाठी येत असतात. दि.२० ऑगस्ट रोजी मंदीरात चोरट्यांनी दाणपेटी फोडली व जवळपास ५४ हजार रुपये लुटले आहेत. सी सी टी व्ही फुटेजमध्ये हे चोरटे दिड तास चोरी करीत असल्याचे स्पष्टपणे दिसत आहेत. याबाबत ट्रस्ट सचिव शांताराम कळसकर यांनी रितसर फिर्याद पारनेर पोलीस स्टेशनमध्ये दिली आहे तसेच सी सी टी व्ही फुटेज सुद्धा दिले आहे. मात्र अद्यापही चोरीचा तपास लावण्यात पोलीसांना अपयश आले आहे. राज्यातील भावीकांनी आजपर्यंत ट्रस्ट पदाधिकारी व विश्वस्त मंडळ तसेच सभासद व ग्रामस्थ यांना चोरीचा तपास लागला का याबाबत भ्रमणध्वनीवर चौकशी करणारे हजारो कॉल आले आहेत.

भावीक व ग्रामस्थ यांच्या भावना तीव्र आहेत मात्र चोरीचा तपास लागेल ही खोटी आशा बाळगीत आम्ही आत्तापर्यंत गप्प बसलो आहे मात्र आमच्या सहनशक्तीचा अंत झाला असून पारनेरचे पोलिस किती अकार्यक्षम आहेत हेच यातून सिद्ध झाले आहे. मात्र येत्या दि.३१ ऑगस्ट पर्यंत चोरीचा तपास न लागल्यास तिव्र आंदोलन यामध्ये रास्ता रोको, गाव बंद उपोषण हे आंदोलन करुन शांततामय मार्गाने आंदोलन करण्याचा इशारा ट्रस्ट व ग्रामस्थ यांनी निवेदनाद्वारे दिला आहे. या निवेदनावर सर्व पदाधिकारी, विश्वस्त मंडळ, सल्लागार मंडळ,सभासद व ग्रामस्थ यांच्या सह्या आहेत. याबाबत बोलताना पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे यांनी सांगितले की ग्रामस्थ व भावीक यांच्या भावना तिव्र आहेत याबाबत अनेक निवेदने आम्हाला उपलब्ध झाली आहेत. तसेच पारनेर तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष उदय शेरकर व कार्याध्यक्ष दत्ता उनवने तसेच सर्व पत्रकार यांनी सुद्धा निवेदन दिले आहे.

# विद्यार्थिनींनी पोलीस बांधवांना बांधल्या राख्या



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी शहर :** रक्षाबंधनाच्या निमित्ताने शहरातील एम. एम. निऱ्हाळी विद्यालयातील विद्यार्थिनींनी पाथर्डी पोलीस ठाण्यात भेट देऊन पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या हातावर राख्या बांधल्या. समाजाच्या सुरक्षेसाठी अहोरात्र कर्तव्य बजावणाऱ्या पोलीस बांधवांप्रती विद्यार्थिनींनी यावेळी कृतज्ञता व्यक्त केली.

पो. नि. आनंद कोकरे, निवृत्ती आगरकर, संदीप मुरकुटे, रोहन खंडागळे, सायकर, नागेश वाघ, गोपाळ ढवळे आदी पोलीस कर्मचाऱ्यांना विद्यार्थिनींनी राख्या बांधून रक्षाबंधनाचा सण साजरा केला. या वेळी पोलीस आणि विद्यार्थिनींमधील आपुलकीचा व विश्वासाचा धागा अधिक दृढ झाल्याचे चित्र दिसून आले.

इयत्ता दहावीतील विद्यार्थिनी प्रतीक्षा भाबड हिने सांगितले की, पोलीस आपल्या संरक्षणासाठी सदैव तत्पर असतात. त्यांच्या कर्तव्यनिष्ठेमुळे नागरिक सुरक्षित जीवन जगत आहेत. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने पोलीस बांधवांचा आदर राखून त्यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे आवश्यक आहे.

या उपक्रमास विद्यालयाचे प्राचार्य संजय घिगे, ज्येष्ठ शिक्षक महादेव आव्हाड, पर्यवेक्षक माणिक पालवे, बाळासाहेब घुले, प्रा. जनार्दन बोडखे, रामनाथ चौधरी, गणेश सरोदे, रवी गीते तसेच शिक्षिका अपर्णा शेळगावकर, सुरेखा वाघमोडे, भारती सोलाट आदी उपस्थित होते.

# प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर माळेगाव-ने येथील 'घेराव आंदोलन' 'स्थगित'

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव :** पाणलोट क्षेत्रातील सात बंधारे, तलाव व नालाबंडिंग वर्षातून सहा वेळा पाण्याने समृद्ध करावेत, या मुख्य मागणीसाठी माळेगाव-ने (ता. शेवगाव) येथील शेतकरी, महिला व युवकांनी ताजनापूर लिफ्ट योजनेच्या पाण्यासाठी सुरू केलेले घेराव आंदोलन दुसऱ्या दिवशी उशिरा प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर मागे न घेता 'स्थगित' करण्यात आले आहे.



'ताजनापूर लिफ्ट योजने'चे जनक ड. शिवाजीराव काकडे, जि.प च्या माजी सभापती हर्षदा काकडे यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी (२४ ऑगस्ट) सकाळपासून सुरू झालेल्या या आंदोलनात शेतकऱ्यांनी संपूर्ण रात्र कार्यालय परिसरातच व्यतीत केली. तेथेच स्वयंपाक करून जेवण केले. रात्रभर अभंग, हरिपाठ आणि भजनाच्या माध्यमातून आंदोलनाची धग कायम ठेवली गेली.

मंगळवारी सकाळी आंदोलकांनी प्रथम उपविभागीय अधिकारी कार्यालय परिसराची स्वच्छता करत प्रशासनाला एक अनोखा व सनदशीर संदेश देत दिवसभर कार्यालय परिसरात ठाण मांडले. दुपारचे जेवण देखील तेथेच करत भजने व अभंग गायली.

यावेळी श्रीहरी कुलकर्णी, दत्तात्रय गुळमकर, अविनाश आव्हाड व इतर कर्मचाऱ्यांसह जगन्नाथ गावडे, लक्ष्मण गवळी, देविदास गिऱ्हे, भाऊसाहेब सातपुते, अशोक ढाकणे, रामजी पोटफोडे, भारत भालेराव, आणि माळेगाव ने व तालुक्यातील विविध गावातील शेतकरी, महिला व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जवळा परिसरात अवैध धंद्यांचा सुळसुळाट

## पोलिसांच्या भूमिकेवर ग्रामस्थांचे प्रश्नचिन्ह

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**निघोज :** जवळा परिसरात विविध अवैध धंद्यांना मोठ्या प्रमाणात ऊत आल्याची चर्चा ग्रामस्थांमध्ये आहे. बसस्थानक परिसर, गावकुसालगतचा भाग तसेच गावातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गालगत मटका, जुगार, गांजा, गुटखा आणि देशी-विदेशी व गावठी दारूची विक्री सुरू असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

अवैध धंद्यांमुळे परिसरातील अनेक तरुण व्यसनाच्या आहारी जात असल्याची चिंता ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. कामधंदा सोडून काही तरुण मटका, जुगार आणि दारूच्या नादी लागत असल्याने अनेक कुटुंबांवर आर्थिक व सामाजिक संकट निर्माण होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. दर दोन-तीन महिन्यांत एखाद्या तरुणाचा व्यसनामुळे मृत्यू होत असल्याचा दावाही काही ग्रामस्थ करीत आहेत. या दाव्यांची प्रशासनाने वस्तुनिष्ठ पडताळणी करणे गरजेचे आहे.

अवैध धंद्यांवर पोलिसांकडून अपेक्षित कारवाई होत नसल्याने त्यांचे धाडस वाढत असल्याची चर्चा आहे. काही ठिकाणी भरदिवसा अवैध व्यवसाय सुरू असल्याचेही ग्रामस्थ सांगतात. मनुष्यबळाच्या कमतरतेचे कारण पुढे केले जात असल्याची नागरिकांची तक्रार आहे.

अवैध धंद्यांविरोधात आवाज उठविणाऱ्या नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण केले जात असल्याचा आरोपही होत आहे. तसेच काही 'पांढरपेशे' व्यक्तींचा अशा व्यवसायांना प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष पाठिंबा असल्याची चर्चा आहे.

दरम्यान, पोलिस प्रशासनाने गेल्या काही महिन्यांत अवैध धंद्यांवर किती कारवाया केल्या, किती गुन्हे दाखल केले आणि किती जणांवर कारवाई केली, याची माहिती जाहीर करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. जवळ्यातील अवैध धंद्यांवर कारवाई कधी, कुठे आणि कशी होणार? हा प्रश्न आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

# शेतकऱ्यांना पावसाची प्रतीक्षा : फळबागांना टँकरने पाणी

## हंगाम वाया जाण्याची भीती

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**करंजी :** वैजू बाभुळगाव , शिराळ, घाटशिरस , दगडवाडी आदी परिसरामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये फळबाग असून पाऊस न आल्यामुळे शेतकरी फळबागांना टँकरने पाणी विकत घेऊन घालत आहेत. पाऊस न आल्यास फळबागा उध्वस्त होण्याची भीती शेतकऱ्यांमधून व्यक्त करण्यात येत आहे.

याबाबत सविस्तर असे की गेल्या काही वर्षांमध्ये पाऊस चांगल्या प्रमाणात होत असल्यामुळे डोंगर भागातील जमिनीमध्ये शेतकऱ्यांनी फळबाग लागवड केली. कमी खर्चात व शाश्वत पीक म्हणून शेतकरी या फळबागेकडे पाहत आहेत. गेल्या काही वर्षापासून चांगला भाव मिळत असल्याने कधी न फळबाग करणारे शेतकरी ही आता फळबाग लागवड करत आहेत. अशा परिस्थितीमध्ये सध्या पावसाने खूपच ताण दिलेला आहे गेल्या सात वर्षात सातत्याने पाऊस झाला मात्र यावर्षी सुरुवातच पासून ऊसाची प्रतीक्षा करावी लागत आहे अशावेळी या भागांमध्ये असलेल्या फळबागांना पाण्याची टंचाई भासत आहे. आलेल्या मृग बहाराची फळे हातात तोंडाशी आलेली आहे. त्यामुळे फळ सुकून जाणं , झाड सुकून जाणं ,फळाला पाणी न मिळणे व फळांना चकाकी न येणे असे प्रकार घडत आहेत. त्यामुळे पाणी देणं अपरिहार्य आहे. अशा परिस्थितीत ४ हजार पासून तर ८ हजारापर्यंत पाण्याचे टँकर विकत घेऊन ते शेतकरी आपल्या फळबागांना विकतच पाणी देत आहेत. पाऊस कधी पडेल आता याचा शासन दरबारी ही भरोसा नाही अशी परिस्थिती झाली असल्यामुळे फळबागा टिकवायच्या कसा असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा आहे. आज जरी विकत घेऊन पाणी टँकरद्वारे फळबागेला दिले तरीही भविष्यात पाणी मिळणे अवघड होईल आणि त्यावेळेस निश्चित फळबागा उध्वस्त होण्याची भीती शेतकऱ्यांमधून व्यक्त केली जात आहे त्यामुळे किमान पाणी टँकरद्वारे का होईना पाणी मिळावे ,वांबोरी चारी टप्पा एक असो कि दोन पाणी मात्र मिळाले पाहिजे अशी अपेक्षा शशिकांत क्षेत्रे, सोन्याबापु दानवे, राजेंद्र मरकड ,संदीप अकोलकर ,अशोक टेमकर , प्रदीप टेमकर आदि शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे.



दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

## उपमुख्यमंत्री पवारांचे आ.आशुतोष काळेंनी केले स्वागत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**कोळपेवाडी** : राज्याच्या कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री ना. श्रीमती सुनेत्राताई पवार गुरुवार (दि.२७) रोजी अहिल्यानगर दौऱ्यावर आल्या असता आ. आशुतोष काळे यांनी लोणी येथे कोपरगाव मतदारसंघातील जनतेच्या वतीने त्यांचे स्वागत केले. सहकारी साखर कारखानदारीचे जनक पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांचा १२६ वा जयंती समारंभ आणि साहित्य व कलागौरव पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी उपमुख्यमंत्री ना. श्रीमती सुनेत्राताई पवार अहिल्यानगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आल्या असता आमदार आशुतोष काळे यांनी लोणी येथे त्यांचे कोपरगाव मतदारसंघाच्या वतीने स्वागत केले. या जयंती समारंभ आणि साहित्य व कलागौरव पुरस्कार वितरण या सोहळ्याला आ. आशुतोष काळे यांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार, पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## मराठी शाळा-ग्रंथालये ही मायमराठीची खरी वस्त्रे : विश्वास पाटील

### प्रवरा येथे राज्यस्तरीय साहित्य, कलागौरव व प्रबोधन पुरस्कारांचे वितरण



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर / कोल्हार** : मराठी भाषेचे भविष्य अंधकारमय होण्यापूर्वी मराठी शाळांच्या सुधारणेचा आग्रह धरला पाहिजे. मराठी शाळा आणि पुस्तके उपलब्ध करून देणारी ग्रंथालये ही मायमराठीची खरी वस्त्रे आहेत. महाराष्ट्राची खरी ओळख जपायची असेल तर मराठीसाठी धाडसाने काहीतरी करावे लागेल, असे प्रतिपादन ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक विश्वास पाटील यांनी केले. सहकाराचे जनक पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे-पाटील यांच्या १२६ व्या जयंतीनिमित्त प्रवरा येथे राज्यस्तरीय साहित्य, कलागौरव व प्रबोधन पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विश्वास पाटील होते.

जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के-पाटील यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. यंदाचा 'पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे-पाटील साहित्य जीवनगौरव पुरस्कार' ज्येष्ठ साहित्यिक उत्तम कांबळे यांना प्रदान करण्यात आला. संहिता राजन, सुरेंद्र दरेकर, मालती इनामदार, सचिन शिंदे, मराठी अभ्यास परिषद, निवृत्ती जोरी आणि संजय गोर्डे यांनाही विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आले. पुरस्कारांची घोषणा निवड समितीचे अध्यक्ष डॉ. रावसाहेब कसबे यांनी केली. विश्वास पाटील यांनी विखे-पाटील साहित्य पुरस्काराच्या वाटचालीचे कौतुक करत प्रवरा परिसराच्या साहित्यिक योगदानाचा गौरव केला. मराठी शाळा ही आपली खरी मंदिरे आहेत. जिल्हा परिषद शाळांमधून विद्यार्थी गरुडासारखी उंच भरारी घेत आहेत.

तुमच्या खांद्यावर झेंडा कोणताही असू द्या, दांडा मात्र मराठीचाच ठेवा, असे आवाहन त्यांनी केले. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी प्रवरा परिसराशी असलेल्या जुन्या ऋणानुबंधांचा उल्लेख केला. साहित्यिक व कलाकारांचा सन्मान केल्याने पुरस्काराची प्रतिष्ठाही वाढते. लेखकांच्या संवेदनशीलतेतून साहित्य अधिक समृद्ध होते, असे त्यांनी सांगितले. पुरस्कारार्थी उत्तम कांबळे यांनी पुरस्कारामुळे साहित्यिकांना बळ मिळत असल्याचे नमूद केले. समाजासाठी लिहिणाऱ्या आणि बोलणाऱ्यांच्या पाठीशी उभे राहण्याची भूमिका या पुरस्कारामागे असल्याचे त्यांनी सांगितले. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी प्रवरा परिवाराच्या ३६ वर्षांच्या साहित्य पुरस्कार परंपरेचा आढावा घेतला.

या पुरस्कारांनी सन्मानित साहित्यिकांना साहित्य अकादमी व ज्ञानपीठ पुरस्कार मिळणे हा प्रवरा परिवारासाठी अभिमानाचा विषय असल्याचे त्यांनी सांगितले. मराठी साहित्य, कला व संस्कृतीची अभिरुची जपण्यासाठी हा उपक्रम पुढेही सुरू राहील, असे त्यांनी स्पष्ट केले.

## बापलेकांवर बिबट्याची झडप

### दोन पिलांसह बिबट्याची मादी उसाच्या शेतात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**राहुरी** : 'वेळ आली, पण काळ आला नाही' याचा प्रत्यय राहुरी तालुक्यातील मांजरी येथील बापलेकांना आला. शेतातील कपाशीला पाणी देण्यासाठी गेलेल्या बापलेकांवर दोन पिलांसह असलेल्या बिबट्याच्या मादीने दिवसाढवळ्या अचानक हल्ला केला. या घटनेत भिमराज सखाराम विटनोर (४८) व त्यांचा मुलगा दिगंबर भिमराज विटनोर (१८) हे दोघे जखमी झाले असून, परिसरात बिबट्याची मोठी दहशत निर्माण झाली आहे. मांजरी येथील वळण-मांजरी शिवरस्त्यावरील गट क्रमांक १८६ मध्ये सकाळी साडेआठच्या सुमारास ही घटना घडली. भिमराज व दिगंबर हे कपाशीला पाणी देण्यासाठी शेतात गेले होते. शेजारील उसाच्या शेतात हालचाल दिसल्याने त्यांनी पाहणी केली असता दोन पिलांसह बिबट्याची मादी दिसली. काही क्षणांतच बिबट्याने पोटचारी ओलांडून भिमराज यांच्यावर हल्ला केला. वडिलांवर हल्ला झाल्याचे पाहून दिगंबरने बिबट्याच्या दिशेने मातीचे ढेकूळ भिरकावले. त्यानंतर बिबट्याने दिगंबरकडे मोर्चा वळविला. दोघांच्या आरडाओरड्याने आसपासचे शेतकरी मदतीसाठी धावून आले. ग्रामस्थ येताच बिबट्या उसाच्या शेतात निघून गेला.

हल्ल्यात बापलेकांच्या पोटावर व पायावर जखमा झाल्या. ग्रामस्थांनी त्यांना प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. वैद्यकीय अधिकारी डॉ. मल्हारी कौतुके यांनी प्राथमिक उपचार केल्यानंतर दोघांना पुढील उपचारासाठी नगर येथील सिव्हिल हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले.

घटनेची माहिती मिळताच वनपरिक्षेत्र अधिकारी ज्ञानेश्वर साळुंके, वनपाल महेश ससे, वनरक्षक रामचंद्र आडगळे, बाळासाहेब आटूळे, निलेश जाधव, मेजर गवळी व वाहनचालक ताराचंद गायकवाड यांनी घटनास्थळी पाहणी केली. बिबट्याच्या मादीसह पिल्लांचा शोध घेऊन पिंजरा लावण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. वनरक्षक आडगळे यांनी बिबट्यासोबत दोन पिल्ले असल्याची माहिती दिली.

या घटनेमुळे मांजरी परिसरात पुन्हा बिबट्याची दहशत निर्माण झाली असून, शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

## टाकळीभान टेल टँक (गोविंद सागर) पूर्ण क्षमतेने भरला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**टाकळीभान** : श्रीरामपूर तालूक्यातील टाकळीभानसह परिसरातील गावांना वरदान ठरलेला शेतकर्यांची कामधेनू असलेला टेलटँक ( गोविंदसागर ) तुडुंब भरल्याने ग्रामस्थ व शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण पसरले आहे. १९७२ च्या दुष्काळात माजी कृषी मंत्री दिवंगत गोविंदराव आदिक यांच्या प्रयत्नातून टाकळीभान टेलटँकची निर्मिती झालेली आहे. या टेलटँकला स्वतः चा पाण्याचा स्त्रोत नसल्याने टेलटँक भंडारदरा धरणाच्या ओव्हरफ्लोच्या पाण्यातून कालव्याद्वारे भरण्याची तरतुद आहे.

या टेलटँकला सिंचनासाठी कालवा असून या कालव्याद्वारे टाकळीभानचा काही भाग व घोगरगावमधील काही भागाची शेती सिंचनाखाली आलेली आहे. या टेलटँकची साठवण क्षमता १९७ दशलक्ष घनफुट आहे. या टेलटँकच्या होणाऱ्या पाझरामुळे टाकळीभानसह परीसरातील ७ ते ८ गावांची शेती हिरवीगार होवून परिसर सुजलाम सुफलाम झाला आहे. टेलटँक जवळ टाकळीभानसह परिसरातील सात ते आठ गावांच्या पाणी पुरवठा योजना आहेत. त्यामुळे या टेलटँकच्या पाणी पातळीकडे परीसराची नेहमीच बारीक नजर राहते व जलसंपदा विभागालाही या टेलटँकमुळे पाणी पट्टीच्या माध्यमातून महसुल मिळत असल्याने या विभागाचेही पाणी पातळीकडे लक्ष असते. धरण क्षेत्रात जोरदार पाऊस पडल्याने भंडारदरा, निळवंडे ही धरणे तुडूंब भरली त्यामुळे प्रवरा नदीच्या पात्रात ओव्हरफ्लोचे पाणी सोडण्यात आल्याने जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता स्वप्निल काळे यांच्या मार्गदर्शनाखाली वडाळा उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता संजय कल्हापुरे यांच्या आदेशाने प्रवरा डाव्या कालव्यातून थेट टाकळीभान टेलटँकमध्ये हे ओव्हरफ्लोचे पाणी सोडण्यात आले होते.

बेलपिंपळगावचे शाखा अभियंता शंतनू मारवाडी, कालवा निरीक्षक अप्पासाहेब तनपुरे, मदतनिस विनोद साठे या जलसंपदा विभागाच्या कर्मचाऱ्यांनी गेली पंधरा वीस दिवस टेलटँक भरण्यासाठी परिश्रम घेतल्याने अखेर काल रविवारी सायंकाळी टाकळीभान टेलटँक पुर्ण क्षमतेने भरल्याने परीसरातील शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलले आहे. रब्बी हंगामी पिकांचे नियोजन आता परीसरातील शेतकऱ्यांना करता येणार आहे. टेलटँक ओव्हरफ्लो झाल्याने परिसरातील शेतकऱ्यांनी जलसंपदा विभागाच्या आधिकारी व कर्मचाऱ्यांचे आभार व्यक्त करुन धन्यवाद दिले आहेत.

> शेतकर्यांनी ७ नं. पाणी अर्ज भरावेत व पाण्याची मागणी नोंदवावी. तसेच आपल्या परिसरातील चार्या पोटचार्या दुरूस्ती करून घ्यावी. जेणेकरून शेतीसाठी पाणी मिळणे सोपे जाईल असे आवाहन पाटबंधारे खात्याच्या वतीने शेतकर्यांना करण्यात आले आहे.

## पारनेरमध्ये कांदा ५२०० क्विंटल



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**निघोज** : पारनेर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मुख्य बाजार आवारात बुधवारी (दि. २६ ऑगस्ट) कांद्याची विक्रमी आवक झाली. बाजार समितीच्या आवारात ३७ हजारांहून अधिक कांदा गोण्यांची आवक झाल्याने दिवसभर मोठी गर्दी आणि उलाढाल पाहायला मिळाली. विविध प्रतवारीच्या कांद्याला गुणवत्तेनुसार दर मिळाले असून उत्तम प्रतीच्या अपवादात्मक कांद्याला तब्बल ५ हजार २०० रुपये प्रतिक्विंटलपर्यंतचा उच्चांकी भाव मिळाला. बाजार समितीच्या अधिकृत बाजारभाव पत्रकानुसार प्रथम प्रतीच्या कांद्याला ४ हजार ६०० रुपयांपर्यंत दर मिळाला. इतर प्रतवारीच्या कांद्याला २ हजारांपासून पुढे दर मिळाले. गुणवत्तापूर्ण कांद्याला सर्वसाधारण दरापेक्षा चांगला भाव मिळत असल्याने कांदा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. मोठ्या प्रमाणात झालेल्या आवकेमुळे बाजार समितीच्या परिसरात कांद्याची मोठी उलाढाल झाली. दरम्यान, शेतकऱ्यांनी आपल्या कांद्याची योग्य प्रतवारी करून जाहीर लिलाव पद्धतीने विक्री करावी, असे आवाहन बाजार समितीने केले आहे. शेतमालाच्या विक्रीचे व्हिडिओ काढून व्हॉट्सप, फेसबुक, इन्स्टाग्राम अथवा अन्य समाजमाध्यमांवर प्रसारित करू नयेत, अशी सूचना बाजार समितीने केली आहे. अशा व्हिडिओमुळे शेतकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण होण्याची शक्यता असल्याचे समितीने नमूद केले.

> पारनेर बाजार समितीत कांद्याची मोठ्या प्रमाणावर आवक होत असून गुणवत्तापूर्ण कांद्याला चांगला दर मिळत आहे. शेतकऱ्यांनी कांद्याची योग्य प्रतवारी करून जाहीर लिलावात विक्री करावी. बाजारभावाची अधिकृत माहिती घेऊनच शेतमाल विकावा. शेतकऱ्यांना त्यांच्या मालाचा योग्य मोबदला मिळावा, यासाठी बाजार समिती पारदर्शक पद्धतीने काम करीत आहे.
>
> **गंगाराम बेलकर, (सभापती, बाजार समिती पारनेर)**

## पो. नि. किरणकुमार कबाडी यांची याचिका मॅटने फेटाळली

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी** : अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेचे माजी पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांची नुकतीच शिर्डी मंदिर सुरक्षा विभागात बदली करण्यात आली होती. ही बदली अन्यायकारक असल्याचा दावा करत त्यांनी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण (मॅट) मध्ये धाव घेतली होती. मात्र, न्यायाधिकरणाने त्यांची याचिका फेटाळून लावली आहे. त्यामुळे त्यांना आता पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार बदलीच्या ठिकाणी, म्हणजेच शिर्डी मंदिर सुरक्षा विभागात तात्काळ हजर होणे बंधनकारक असणार आहे. कबाडी यांनी आपली बदली प्रशासकीयदृष्ट्या अन्यायकारक असल्याचा युक्तिवाद मॅट समोर केला होता. मात्र न्यायाधिकरणाने प्रशासनाचा बदलीचा आदेश कायम ठेवत याचिका फेटाळली. दरम्यान, या निर्णयानंतर किरणकुमार कबाडी यांनी शिर्डी येथे रुजू होणे अपेक्षित आहे.

## कत्तलीसाठी चालविलेल्या ११ गोवंशीय जनावरांची सुटका

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : शहरातील केडगाव बायपास परिसरातील टोल नाका जवळ कोतवाली पोलिसांनी मोठी कारवाई करून कत्तलीसाठी घेऊन जाणाऱ्या ११ गोवंशीय जनावरांची सुटका केली. या प्रकरणात पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून ९ लाख ३० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. याबाबत पुढील सूत्रांकडून समजलेली माहिती अशी की, सावेडी येथील गुलमोहर रस्त्यावर राहणारे अमर शिवाजी सैंदर यांनी याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. दि. २६ ऑगस्ट रोजी मध्यरात्रीच्या सुमारास केडगाव टोल नाक्याजवळ एका वाहनातून जनावरांची बेकायदेशीर वाहतूक होत असल्याची माहिती समोर आली होती. पोलिसांनी संशयित आयशर वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये चारा पाण्याची कोणतीही सोय न करता अत्यंत क्रूरपणे दाबून ठेवलेल्या ११ गाई मिळून आल्या. या गोवंशाची कतलीच्या उद्देशाने वाहतूक केली जात असल्याचे तपासात उघड झाले. याप्रकरणी पोलिसांनी वाहन चालक मारुती तुकाराम कोरे (रा. माळशिरस, जिल्हा सोलापूर) आणि शुभम संजय खाडे (रा. अकलूज, जिल्हा सोलापूर) या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईत ६ लाख रुपये किमतीचे वाहन आणि ३ लाख ३० हजार रुपयांची ११ जनावरे असा एकूण ९ लाख ३० हजार रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे. कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार गोविंद गोल्हार या प्रकरणाचा पुढील तपास करीत आहेत.

## स्व. ॲड पोपटराव पटारे यांच्या दशक्रिया विधीनिमित्त वडाच्या झाडाचे वृक्षारोपण



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**टाकळीभान** : श्रीरामपूर तालुक्यातील कारेगाव येथील प्रगतशील शेतकरी व नामांकित विधीज्ञ स्व. पोपटराव बबनराव पटारे यांच्या दशक्रिया विधीनिमित्त सुशिलादेवी वेल्फेअर फाउंडेशन व निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ यांच्या संयोजनातून पाचशे वर्ष टिकणारे वडाच्या झाडाचे वृक्षारोपण करण्यात आले. व पर्यावरण संरक्षणाचा अनोखा संदेश देण्यात आल्या. बदलते तापमान, पर्जन्याचा असमतोल, मानव जातीला भेडसावणारे विविध आजार याचे मूळ पर्यावरण प्रदूषण व त्याची हानी झाल्याने होत आहेत. त्यामुळे वृक्षारोपण व संवर्धन ही काळाची गरज झाली आहे. आपल्या प्रिय कुटुंबीयांच्या व्यक्तीची आठवण राहावी म्हणून सर्वात जास्त ऑक्सिजन व सावली देणारे वडाचे झाड स्व.ड पोपटराव पटारे यांच्या स्मृतिनिमित्त पटारे व त्यांच्या कुटुंबीयांच्या वतीने लावण्यात आले. दशक्रिया विधीप्रसंगी ह. भ. प. नामदेव महाराज हरड यांनीही आपल्या प्रवचनातून वृक्षारोपण व पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला, व वृक्ष यावर आपले सर्वस्वी जीवन अवलंबून असून ते ईश्वरा समान असल्याचे म्हटले. वृक्षारोपण प्रसंगी श्रीरामपूर पंचायत समितीचे माजी सभापती दीपक अण्णा पटारे, श्रीरामपूर पंचायत समितीच्या माजी सभापती डॉ. वंदनाताई मुरकुटे, निवृत वनाधिकारी व कोंढवड गावचे लोकनियुक्त सरपंच अर्जुन म्हसे, निसर्ग व पर्यावरण मंडळाचे राज्य संघटक अर्जुन राऊत, सुशिलादेवी वेल्फअर फाउंडेशनचे संतोष जाधव, नानासाहेब फाटके, रामदास पटारे,दादासाहेब पटारे, तुळशीराम लवांडे, सुभाष पटारे,अमोल कोलते,नितीन पटारे, अमोल पटारे, पटारे कुटुंबीयांचे नातेवाईक गावातील मान्यवर, पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

## प्रशासकांचे अधिकार की न्यायालयीन मर्यादा?

### सात एकर ताब्याला 'सर्वोच्च' चे संरक्षण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : तालुक्यातील विसापूर - पिंपळगाव ग्रामपंचायतींच्या प्रशासकांच्या अधिकारांबाबत राज्यात सुरू असलेल्या न्यायालयीन घडामोडींच्या पार्श्वभूमीवर जमीन ताब्याशी संबंधित सर्वोच्च न्यायालयाचा एक महत्त्वपूर्ण आदेश चर्चेत आला आहे.

सर्वोच्च न्यायालयाने ५ जून २०२६ रोजी प्रकाश व इतर विरुद्ध जालिंदर व इतर या प्रकरणात याचिकाकर्त्यांच्या मूळ भाडेपट्ट्याखालील सात एकर जमिनीवरील ताब्याला सध्या संरक्षण दिले आहे. मात्र, सात एकरपेक्षा अधिक जमीन ताब्यात असल्याचे आढळल्यास ती अतिरिक्त जमीन तातडीने सोडावी लागेल, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

#### सात एकरपुरतेच संरक्षण

सर्वोच्च न्यायालयातील विशेष अनुमती याचिका (दिवाणी) क्रमांक १७०३२/२०२६ ही मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने ७ एप्रिल २०२६ रोजी झखङ क्रमांक ८९/२०१९ मध्ये दिलेल्या निर्णयाविरुद्ध दाखल करण्यात आली आहे. ५ जून रोजी न्यायालयाने याचिकाकर्त्यांनी पूर्वीच्या आदेशानुसार आवश्यक हमीपत्रे दाखल केल्याची नोंद घेतली. त्यानंतर मूळ भाडेपट्ट्याच्या आधारे त्यांच्या ताब्यात असलेल्या सात एकर जमिनीवरून त्यांना बेदखल करू नये, असे निर्देश दिले.

मात्र न्यायालयाने त्याच वेळी एक महत्त्वाची मर्यादाही स्पष्ट केली आहे. प्रत्यक्षात याचिकाकर्त्यांच्या ताब्यात सात एकरपेक्षा अधिक जमीन आढळल्यास त्या अतिरिक्त जमिनीचा ताबा तातडीने सोडावा लागेल. त्यामुळे हा आदेश संपूर्ण जमिनीवरील ताब्याला संरक्षण देणारा नसून, उपलब्ध नोंदीनुसार मूळ भाडेपट्ट्यातील सात एकरपुरता अंतरिम दिलासा आहे.

#### 'प्रशासकांचे अधिकार संपले' असा अर्थ काढणे चुकीचे?

ग्रामपंचायतींवरील प्रशासकांच्या अधिकारांबाबत गेल्या काही महिन्यांपासून राज्यात न्यायालयीन आणि प्रशासकीय पातळीवर मोठी चर्चा सुरू आहे. जानेवारी २०२६ ते डिसेंबर २०२६ या काळात मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींवर प्रशासक नेमण्यासंदर्भात ग्रामविकास विभागाने स्वतंत्र आदेश काढले आहेत.फेब्रुवारीमध्ये राज्य सरकारने मुदत संपणाऱ्या काही ग्रामपंचायतींसाठी विद्यमान सरपंचालाच प्रशासक म्हणून जबाबदारी देण्याचा निर्णय घेतला होता.

त्यांना मदतीसाठी उपसरपंच व सदस्यांची प्रशासकीय समिती ठेवण्याची तरतूद करण्यात आली होती.मात्र सर्वोच्च न्यायालयाचा ५ जूनचा जमीन ताब्यावरील आदेश आणि ग्रामपंचायत प्रशासकांच्या अधिकारांचा प्रश्न हे दोन स्वतंत्र कायदेशीर मुद्दे आहेत. त्यामुळे या आदेशाच्या आधारे ग्रामपंचायत प्रशासकांचे अधिकार संपले किंवा प्रशासक पदच रद्द झाले असा थेट निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही.

#### जमिनीच्या ताब्याचा मुद्दा मात्र गंभीर

या आदेशामुळे जमीन ताब्याच्या प्रकरणांमध्ये एक महत्त्वाचा कायदेशीर संदेश स्पष्ट होतो-न्यायालयीन संरक्षण जितक्या क्षेत्रापुरते दिले आहे, तितक्याच क्षेत्रापुरते ते मर्यादित राहते. सात एकर जमीन भाडेपट्ट्याखाली असल्याचे मान्य करून त्या क्षेत्रातून बेदखल न करण्याचे निर्देश देण्यात आले असले तरी त्यापलीकडे प्रत्यक्ष ताबा असल्यास संबंधितांना अतिरिक्त जमीन सोडावी लागणार आहे.

त्यामुळे महसूल अभिलेख, प्रत्यक्ष मोजणी, भाडेपट्ट्याचे क्षेत्रफळ आणि प्रत्यक्ष ताबा यांचा ताळमेळ हा पुढील टप्प्यात अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.

#### पुढील सुनावणीकडे लक्ष

सर्वोच्च न्यायालयाने हे प्रकरण सहा आठवड्यांनंतर पुन्हा सुनावणीस ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे सध्याचा आदेश हा या टप्प्यावरचा अंतरिम स्वरूपाचा संरक्षणात्मक आदेश आहे. अंतिम हक्क, मालकी किंवा संपूर्ण जमिनीवरील ताब्याबाबत अंतिम निर्णय झालेला आहे, असे मानता येणार नाही.दरम्यान, ग्रामपंचायत प्रशासकांच्या अधिकारांबाबत स्वतंत्र न्यायालयीन आदेश किंवा शासन निर्णय असल्यास त्याचा परिणाम संबंधित ग्रामपंचायतीच्या कारभारावर वेगळ्या पद्धतीने होऊ शकतो.

त्यामुळे जमीन ताबा प्रकरणाचा आदेश आणि प्रशासकांच्या अधिकारांचा प्रश्न यांची सरमिसळ न करता दोन्ही बाबींचा स्वतंत्र कायदेशीर संदर्भ तपासणे आवश्यक आहे. पुढील सुनावणी सहा आठवड्यांनंतर

महत्त्वाचे हा जमीन ताब्याचा आदेश आहे; ग्रामपंचायत प्रशासक पद रद्द करण्याचा आदेश नाही.कायदा स्पष्ट आहे; पण कागदपत्रे त्याहून स्पष्ट असली पाहिजेत. जमीन मोजताना 'अंदाज' चालतो, न्यायालयात मात्र एक इंचही महत्त्वाचा ठरतो.